परळी
# संघर्षनेता
समता, बंधुता, न्याय, अधिकारांचा नेता.
https://www.parlisangharshneta.in 9881265102 संपादक - मोहन व्हावळे
बीड | वर्षे- 11 वे | अंक क्र 68 | रविवार दि. 22 मार्च 2026 | पृष्ठे 4 | किंमत 2 ₹ | RNI: MAHMAR/2016/67060

## "भोंदू बाबासह भोंदू भक्तांवरही कारवाई करा", अशोक खरात प्रकरणात उद्धव ठाकरेंची मोठी मागणी




अंकशास्त्राच्या आधारे भविष्य सांगण्याचा दावा करणाऱ्या नाशिकमधील अशोक खरातला पोलिसांनी अटक केली आहे. याच अशोक खरातची पाद्यपूजा करताना रुपाली चाकणकर यांचे काही फोटो समोर आले होते. त्यामुळे त्यांच्यावर विरोधकांनी टीकेची झोड उठवली होती. त्यानंतर अखेर रुपाली चाकणकर यांना राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा द्यावा लागला.

याच भोंदू बाबा अशोक खरात बरोबर राज्यातील आणखी काही नेत्यांचेही फोटो सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. दरम्यान, अशोक खरात प्रकरणावर आता माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी भाष्य करत 'भोंदू बाबासह भोंदू भक्तांवरही कारवाई करा', अशी मोठी मागणी केली आहे. तसेच राज्यातील राजकारण आणखी किती किती खालच्या स्तरावर नेणार आहात? असा सवालही उद्धव ठाकरे यांनी केला आहे."महाराष्ट्र आणखी किती खालच्या स्तरावर नेणार आहात? महाराष्ट्र जादूटोणा विरोधी कायदा आहे. त्या कायद्याचं पालन करणारेच जर अशा प्रकारे भोंदू बाबाच्या नादी लागत असतील तर भोंदू बाबाच्या भक्तांवर देखील कारवाई झाली पाहिजे. जे राजकारणात भोंदू बाबाचे भक्त दिसत आहेत, त्यांच्यावर देखील कारवाई झाली पाहिजे. या प्रकरणाच्या अनुषंगाने सर्वांची चौकशी करा", असं उद्धव ठाकरे यांनी म्हटलं आहे.

अशा प्रकारे जर गावोगावी भोंदू बाबा असतील आणि त्यांच्याकडे कोणत्याही पक्षाचा कोणताही नेता जात असेल तर त्या नेत्यावरही कारवाई झाली पाहिजे. राज्यातील राजकारण आपण आणखी किती खालच्या पातळीवर नेणार आहात?", असं म्हणत उद्धव ठाकरे यांनी सरकारवर टीका केली.

"हा मुद्दा काही पान 3 वर

## अशोक खरातचा थेट एन्काऊंटर? एका दाव्याने महाराष्ट्रात खळबळ; ठीक 24 तारखेला...



भोंदू बाबा अशोक खरातने भोंदुगिरीच्या मदतीनेत अनेक महिलांवर लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप केला आहे. एका महिलेने समोर येत बलात्कार केल्याची तक्रार दाखल केल्यानंतर अशोक खरातचे हे बिंग फुटले आहे. त्याने वेगवेगळ्या महिलांवर अत्याचार केलेले जवळपास 100 व्हिडीओ असल्याचे बोलले जात आहे. यातील काही व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाले आहेत. हे प्रकरण समोर आल्यानंतर अशोक खरात पोलिसांच्या ताब्यात आहे. त्याच्या ऑफिसमध्ये काम करणाऱ्या नीरज जाधवलाही पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. आता अशोक खरातला कठोरातील कठोर शिक्षा द्यावी अशी मागणी केली जात आहे. असे असतानाच आता त्याचे एन्काऊंटर होणार असल्याचा दावा समोर आला आहे. या दाव्यानंतर एकच खळबळ उडाली आहे.

भूमता ब्रिगेडच्या तृप्ती देसाई यांनी अशोक खरात याचा एन्काऊंटर होऊ शकतो, अशी शंका व्यक्त केली आहे. "अशोक खरात प्रकरणात तीनच दिवसांत रुपली चाकणकर यांचे राज्य महिला आयोगाचे अध्यक्षपद गेले. पान 3 वर

## आज ठळक

### प्रारंभ 2026' मोहीम लॉन्च, 1 एप्रिल 2026 पासून करव्यवस्था बदलणार,




1 एप्रिल 2026 पासून लागू होणाऱ्या नवीन प्राप्तिकर कायद्यापूर्वी सरकारने 'प्रारंभ 2026' मोहीम सुरु केली आहे. या अंतर्गत, नियम सोप्या भाषेत समजावून सांगितले जातील आणि एक नवीन ई-फाईलिंग पोर्टलही सुरु केले गेले आहे. कर प्रणाली सोपी, डिजिटल आणि विश्वासार्ह बनवणे हा यामागचा उद्देश आहे.भारतातील कर प्रणालीत मोठा बदल होणार आहे आणि त्याची तयारी आतापासूनच सुरु झाली आहे. 1 एप्रिल 2026 पासून लागू होणाऱ्या नवीन प्राप्तिकर कायद्याबाबत केंद्र सरकारने देशभरात जनजागृती मोहीम सुरु केली आहे.अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी प्रारंभ 2026 नावाची एक विशेष मोहीम सुरु केली आहे, ज्याचा उद्देश नवीन कायदा सामान्य लोकांपर्यंत सोप्या आणि समजण्यायोग्य भाषेत पोहोचवणे हा आहे. यासोबतच प्राप्तिकर विभागाने 'आयकर वेबसाइट 2.0' हे नवीन ई-फाइलिंग पोर्टल देखील सुरु केले आहे, ज्यामुळे कर भरणे पूर्वीपेक्षा सोपे होईल. कोट्यवधी पगारदार, छोटे व्यापारी आणि व्यावसायिकांच्या कर पद्धतीत हा मोठा बदल घडवून आणणार आहे.

काय आहे 'प्रारंभ 2026' अभियान? दिल्लीत आयोजित एका कार्यक्रमात अर्थमंत्र्यांनी या मोहिमेचा शुभारंभ केला. 'प्रारंभ 2026' ही राष्ट्रीय स्तरावरील जनसंपर्क मोहीम आहे ज्याद्वारे नवीन प्राप्तिकर कायदा 2025 सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवला जाईल.

कायदा लागू होण्यापूर्वी लोकांना पूर्ण वर्षाचा कालावधी देणे हे सरकारचे ध्येय आहे, जेणेकरून ते नवीन नियम चांगल्या प्रकारे समजून घेऊ शकतील आणि कोणताही गोंधळ न करता कर भरु शकतील.

प्रिंट, टीव्ही, रेडिओ, डिजिटल प्लॅटफॉर्म आणि सोशल मीडियाद्वारे ही मोहीम राबविली जाईल. तसेच, मार्गदर्शन नोट्स, व्हिडिओ ट्यूटोरियल्स, माहितीपत्रके आणि वारंवार विचारले जाणारे प्रश्न देखील अनेक भाषांमध्ये उपलब्ध करुन दिले जातील.

नवीन कर कायदा: काय वेगळे असेल? प्राप्तिकर कायदा 2025 म्हणजे केवळ एक दुरुस्ती नसून एक पूर्णपणे नवीन आणि सोपा कायदा आहे. महसूल सचिव अरविंद श्रीवास्तव यांनी सांगितले की, कर प्रणाली अधिक वापरकर्ता-अनुकूल करण्यासाठी हा बदल करण्यात आला आहे. नियम, फॉर्म आणि कार्यपद्धती अशा प्रकारे डिझाइन केल्या आहेत की कमी विवाद असतील आणि लोकांना समजणे सोपे होईल.

त्याच वेळी, अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी यावर जोर दिला की कर भरण्याची प्रक्रिया सुलभ करण्यावर सरकारचे लक्ष आहे, जेणेकरून लोक भीती किंवा गोंधळाऐवजी आत्मविश्वासाने कर भरतील.

प्रारंभ 2026: तळागाळापर्यंत पोहोचणे सीबीडीटीचे अध्यक्ष रवी अग्रवाल म्हणाले की, 'प्रारंभ' म्हणजे धोरण सुधारणा आणि मिशन विकसित भारतसाठी जबाबदार कृती. हे अभियान "नागरिक देवो भव" म्हणजेच करदाता सर्वोच्च मानला जाईल या विचारावर आधारित आहे.

देशभरात 300 हून अधिक कार्यशाळा आयोजित केल्या जातील, ज्यात लोकांना थेट माहिती दिली जाईल. याशिवाय MyGov प्रश्नमंजुषा सारखे संवादात्मक कार्यक्रमही असतील, जेणेकरून लोक सहजपणे जोडले पान 3 वर



● प्रति वर्षीप्रमाणे माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांनी आज परळी शहरात मुस्लिम बांधवांच्या समवेत रमजान ईद साजरी करत मुस्लिम बांधवांना शुभेच्छा दिल्या. यावेळी हिंदू - मुस्लिम सह सर्व समाज बांधवांमध्ये एकता आणि बंधुभाव अबाधित रहावा आणि भारत देश जगातील एक मोठी शक्ती म्हणून प्रचितीस यावा, अशी दुवा केली...

### माझे पती तज्ज्ञ अथवा व्यावसायिक ज्योतिषी नव्हते"; अशोक खरातच्या पत्नीनं पहिल्यांदाच मांडली भूमिका



अशोक खरातची पती कल्पना खरात यांनी या प्रकरणावर पहिल्यांदाच आपली भूमिका स्पष्ट केली आहे. यामध्ये आपला पती कुठल्या प्रकारे तज्ज्ञ किंवा व्यावसायिक ज्योतिषी नव्हता, असं त्यांनी म्हटलं आहे. त्याचबरोबर त्यांनी आपल्या पतीविरोधात केलेल्या कारवाईवरुन अनेक आरोपही केले आहेत.कल्पना खरात यांनी म्हटलं

स्वयंघोषित ज्योतिषी आणि आध्यात्मिक गुरु अशोक खरात याच्यावर शेकडो महिलांचा लैंगिक छळ तसंच अत्याचार प्रकरणी अटक झाली आहे. त्याच्याकडून 58 हून अधिक आक्षेपार्ह व्हिडिओ पोलिसांनी जप्त केले आहेत. याच पान 3 वर

## "मला जास्त बोलायला लावू नका", चंद्रकांत पाटलांचं जयंत पाटलांच्या भाजपा प्रवेशाबाबत मोठं वक्तव्य



गेल्या काही महिन्यांत राज्याच्या राजकारणात राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) पक्षाचे नेते जयंत पाटील यांच्या भाजपा प्रवेशाच्या चर्चा अनेकदा रंगल्याचं पाहायला मिळालं. मात्र, त्यानंतर जयंत पाटील यांनी स्वत: या चर्चा फेटाळून लावल्या. पण आता पुन्हा एकदा जयंत पाटील यांच्या भाजपा प्रवेशाच्या चर्चा रंगल्या आहेत. माजी खासदार संजयकाका पाटील आणि मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केलेल्या वक्तव्यामुळे या चर्चांना उधाण आलं आहे.

सांगली जिल्हा परिषदेच्या निवडणुकीनंतर माध्यमांशी संवाद साधताना संजयकाका पाटील यांनी जयंत पाटील यांच्याबाबत बोलताना मोठं वक्तव्य केलं होतं. 'जयंत पाटील भाजपामध्ये जाण्यासाठी आग्रही होते', असं संजयकाका पाटील यांनी म्हटलं. त्यानंतर मंत्री चंद्रकांत पाटील यांनीही जयंत पाटील यांच्या भाजपा प्रवेशाच्या चर्चांबाबत मोठं वक्तव्य केलं आहे. 'जयंत पाटलांच्या भाजपा प्रवेशाच्या सर्व पान

## प्रा.टी.पी. मुंडे यांनी दिल्या रमजान ईदच्या मुस्लिम बांधवांना शुभेच्छा!

### रमजान ईद हिंदू मुस्लिम ऐक्याचे प्रतीक!



परळी वैजनाथ प्रतिनिधी हिंदू मुस्लिम ऐक्याचे प्रतीक असलेला रमजान ईद हा मुस्लिम बांधवांचा पवित्र सण संबंध देशभरामध्ये मोठ्या उत्साहात साजरा केला जातो त्याचे औचित्य साधून शिवसेनेचे नेते तथा बीड जिल्हा संपर्कप्रमुख प्रा.टी.पी.मुंडे (सर) यांच्या प्रमुख उपस्थिती त्यांनी मुस्लिम बांधवांना गळाभेट घेत ईदच्या शुभेच्छा दिल्या.

नेहरु चौक व मलकापूर येथील ईदगाह या ठिकाणी सकाळी शुभेच्छा देण्यासाठी पेंडल लावण्यात आला मुस्लिम बांधवांची नमाज पठण व धार्मिक विधी पूर्ण झाल्यानंतर त्यांनी गळाभेट घेत शुभेच्छा दिल्या. मुस्लिम बांधव आणि प्रा.टी.पी. मुंडे सर हे एक समीकरण गेल्या 30 वर्षापासून तयार झाले आहे. दरवर्षी मुस्लिम बांधवांना पवित्र रमजानच्या शुभेच्छा ते देत असतात या महिन्यात अतिशय कडक उन्हाळ्यात मुस्लिम बांधव अल्लाची उपासना करत महिनाभर रोजा (उपवास) करतात. मुस्लिम बांधवांच्या घरी जाऊन त्यांची पान 3 वर

### भोंदुबाबा खरात प्रकरणी केसरकरांचा खुलासा, त्या खळबळजनक आरोपांवर काय म्हणाले?



नेतेमंडळी तर त्याचे आशीर्वाद घेतानाही या फोटोंमध्ये दिसत आहे. त्याच्याविरोधात बलात्काराचा गुन्हा दाखल झाला असून

भोंदुबाबा अशोक खरातचे प्रकरण समोर आल्यानंतर राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे. या खरातचे अनेक राजकीय नेत्यांचे त्याच्यासोबत फोटो आहेत. विशेष म्हणजे काही त्याने अनेक महिलांचे लैंगिक शोषण केलेले आहे, असा आरोप करण्यात आला आहे. हे प्रकरण समोर आल्यानंतर ठाकरे गटाचे नेते तथा खासदार संजय राऊत पान 3 वर

### मंत्री विखेंचा फोटो अन् खरात कनेक्शन; सपकाळांचा राजकीय 'टायमिंग' गेम!



संपर्कावरुन, राज्यातील अनेक बडे नेते अडचणीत सापडले आहेत. विशेष करून, सत्ताधारी महायुतीच्या

बलात्काराच्या गुन्ह्यात पकडलेला नाशिकचा भोंदूबाबा कॅप्टन अशोक खरात याच्या राजकीय संपर्काचे किस्से थांबायला तयारी नाही. खरात याच्या राजकीय नेत्यांची मोठी अडचण झाली आहे. विरोधकांनी यावर टायमिंग साधत, सत्ताधाऱ्यांना चांगलच खिंडत गाठलं आहे. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष पान 3 वर

## आ.धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली पाणी पुरवठा सभापती सौ.जयश्रीताई रवींद्र गित्ते यांच्या हस्ते मलिकपूरा भागात 6 किमी नवीन वाढीव पाणीपुरवठा पाइपलाईनचा शुभारंभ

● परळीतील पाणीप्रश्न तात्काळ सोडवण्यासाठी नगर परिषद पाणी पुरवठा विभाग नेहमी तत्पर – पाणी पुरवठा सभापती सौ.जयश्रीताई रवींद्र गित्ते



परळी वैजनाथ (प्रतिनिधी) :-

परळी विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आ. धनंजय मुंडे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली परळी वैजनाथ शहरातील पाणीपुरवठा प्रश्न नगर परिषद पाणीपुरवठा विभाग सोडविण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे. शहरातील नागरिकांना नियमित पाणी मिळावे यासाठी विविध उपाययोजना राबविल्या जात आहेत. शहराच्या इतर भागात पाणीप्रश्न उद्भवल्यास त्वरित उपाययोजना करुन समस्या दूर करण्यास नगर परिषद कटिबद्ध आहे. कोणत्याही परिस्थितीत शहराला पाणी कमी पडू देणार नाही. तसेच, उन्हाळ्याच्या हंगामात नागरिकांनी पाणी जपून वापरावे आणि अपव्यय टाळावा असे आवाहन सभापती सौ. जयश्रीताई गित्ते यांनी मलिकपूरा भागात 6 किमी नवीन वाढीव पाणीपुरवठा पाइपलाईनचा शुभारंभ प्रसंगी प्रतिपादन केले आहे. परळीतील पाणीप्रश्न तात्काळ सोडवण्यासाठी पान 3 वर

# रेवडी-रमण!

निवडणूक आयोगाने पश्चिम बंगाल, तमिळनाडू, केरळ, पुडुचेरी आणि आसाम या राज्यांतील विधानसभा निवडणुका वेळीच जाहीर केल्या हे बरे झाले. या राज्यांत केंद्रास जे काही करावयाचे होते ते करून झाले, राज्यपालांचे पत्तेही पिसून झाले. तेव्हा विधानसभा निवडणुकांच्या घोषणेस अधिक विलंब लावण्यात काही शहाणपण नव्हते. निवडणूक आयोगाने हे बरीक हेरले आणि निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला. त्यानुसार पुढील महिन्यात 9 एप्रिलला पहिले मतदान होईल आणि मे महिन्यातील 4 तारखेस सर्व राज्यांची मतमोजणी होईल. या कार्यक्रमातील प्रथमदर्शनी नजरेत भरणारी बाब म्हणजे पश्चिम बंगालात अवघ्या दोन टप्प्यांत मतदान असेल. निवडणूक आयोगास उशिराने का असेना कसे शहाणपण सुचते याची ही खूण. पश्चिम बंगाल या एका राज्यात याआधी सात-सात, आठ-आठ फेऱ्यांत मतदान घेतल्यानंतर आणि त्यापेक्षा मुख्य म्हणजे मतदानाचे जितके टप्पे अधिक तितका केंद्रीय सत्ताधाऱ्यांस धोका जास्त या गेल्या लोकसभा निवडणुकीतील धड्यानंतर पश्चिम बंगालात निवडणुका लांबवणे योग्य नाही, असा विचार निवडणूक आयोगाने केला नसेलच असे नाही. काही का असेना. सर्व राज्यांतील ही प्रक्रिया एका महिन्याच्या आतच पूर्ण होईल. हा उन्हाळ्याचा काळ. त्यात निवडणुका असलेली पाचपैकी चार राज्ये किनारपट्टीवरील. त्यामुळे या काळात वातावरणात आर्द्रता अधिक असणार. अशा हवेत काहीही न करताही शरीरातून घामाच्या धारा वाहतात. त्यात आता हे कर्कश्श राजकारण. त्यामुळे समस्त लोकशाहीलाच घाम फुटेल असे दिसते. असो. आता या राज्यांमधील राजकारणाविषयी.

सर्व राजकीय पक्षांत या निवडणुकीत सर्वात सुखी असेल तो भाजप. त्या पक्षाकडे आसामखेरीज गमावण्यासारखे काही नाही. म्हणजे होईल ती कमाईच. चांगली कामगिरी झाली तर या पक्षाचे नेते प्रस्थापितांस धक्क्यास लावल्याचा आनंद उपभोगतील आणि तसे न झाल्यास आमचे काही नव्हतेच असे म्हणून पुढच्या निवडणुकांच्या तयारीस लागतील. या निवडणुकांत खरा घोर लागेल तो काँग्रेस पक्षास. भाजपचा प्रयत्न आहे ते एक राखून वर काही मिळवण्याचा असेल तर दुसऱ्या बाजूस काँग्रेस एक तरी काही मिळवण्याच्या संघर्षात असेल. बारा पक्षांचे पाणी पिऊन कडवे हिंदुत्ववादी झालेले आसामचे मुख्यमंत्री हिमंत बिस्व सर्मा यांनी 'मियाँ' मुसलमानांचा मुद्दा काढून आपल्या हातखंडा खेळाची पहिली चाल खेळलेली आहेच. तेथे काँग्रेसचे गौरव तरुण गोगोई हे या धार्मिक ध्रुवीकरणात किती विश्वासार्ह वाटतात ही बाब महत्त्वाची ठरेल. तसेही त्या राज्यात भाजपच्या सत्तेस दहा वर्षे पूर्ण झालेली आहेत आणि सर्मा यांना मुख्यमंत्रीपदी पाच. पण जवळपास गेल्या दोन दशकांहून अधिक काळ ते सत्तेत आहेत. काँग्रेसच्या तरुण गोगोई यांच्याही मंत्रिमंडळात हिंदुत्ववादी सर्मा होते. या निवडणुकीतही ते विजयी झाले तर मुख्यमंत्रीपदी असताना सत्ता राखणारे ते भाजपचे दुसरे मुख्यमंत्री ठरतील. उत्तर प्रदेशच्या योगी आदित्यनाथांच्या पंगतीत त्यांचे ताट मांडले जाईल. ही बाब भाजपमधल्याच किती जणांसाठी स्वागताची ठरेल हा प्रश्नच. भाजपस खरा रस असेल तो शेजारील पश्चिम बंगालात. त्या राज्यात ममता बॅनर्जी यांचे तृणमूल साम्राज्य उखडून टाकण्यासाठी भाजप प्रयत्नांची पराकाष्ठा करत असून आगामी महिनाभरात हे प्रयत्न सर्वार्थाने शिगेला पोहोचतील. इतके दिवस ममताबाई भाजपच्या 'अरे'स तितकेच टोकदारपणे 'का रे'चे प्रत्युत्तर देत असून अजून तरी त्यांची दमछाक झाल्याचे चिन्ह नाही. सत्ता राखल्यास त्यांची ही मुख्यमंत्रीपदाची चौथी खेप ठरेल. म्हणजे निदान मुख्यमंत्रीपदाच्या कारकीर्दीत त्या नरेंद्र मोदी यांस मागे टाकतील.तथापि पूर्वेकडील या राज्यांच्या तुलनेत दक्षिणेच्या राज्यांतील लढत इतकी चुरशीची नसेल. अपवाद फक्त केरळ या राज्याचा. तेथे डावे सत्तेवर आहेत. पण त्यांचे आव्हानवीर उजवे नसतील. काँग्रेस-प्रणीत आघाडी असेल. म्हणजे एकाअर्थी विरोधी पक्षीय 'इंडिया' आघाडीतील दोन घटकांतच स्पर्धा. आसाम खालोखाल जरा तरी बऱ्या कामगिरीची अपेक्षा काँग्रेसला असेल तर ती याच राज्यात. अन्यत्र काँग्रेसने आपला राष्ट्रीय पक्षाचा झेंडा प्रादेशिक पक्षांच्या झेंड्याखाली गुंडाळून ठेवलेला आहे. शेजारील तमिळनाडू हे त्याचे उदाहरण. त्या राज्यात द्रमुक हे विरोधी आघाडीचे

# फुललेली मैत्री: आठवणीची पाने उलगडताना

**डॉ. दशरथ भोसले**



प्रस्तावना:

आजच्या धकाधकीच्या जीवनात माणूस पुढे जाताना अनेकदा आपल्या भूतकाळातील गोड आठवणी विसरून जातो. परंतु या आठवणीच मनाला नवचैतन्य देतात आणि जीवनाकडे पाहण्याचा सकारात्मक दृष्टिकोन देतात. अशाच काही बालपणीच्या आठवणी आणि मैत्रीच्या निखळ भावनेतून उलगडणारा हा अनुभव आहे. या लेखातून जुन्या काळातील साधेपणा, मैत्रीची ऊब आणि आयुष्य जगण्याची खरी मजा पुन्हा अनुभवण्याचा प्रयत्न केला आहे.

विनोदी कथा:

बरेच दिवसांनी पुण्यात गेल्यावर मला निवांत वेळ मिळाला. सारसबागेतील श्री गजाननाचे दर्शन घेतले. शांतपणे बागेतील बाकावर बसलो. जुन्या आठवणीत पूर्णपणे रंगून गेलो.

इ. स. 1955-56 च्या दरम्यान आई-वडिलांबरोबर श्रावणी सोमवारी पर्वतीवर जाताना तळ्यातील पेशवेकालीन गणपती मंदिर दिसायचे. रस्त्याच्या दुसऱ्या कडेला प्राणी संग्रहालय पेशवे पार्क होते. सुटीच्या दिवशी पेशवे पार्कमधील प्राणी पाहून झाले की, आम्हा दोघा भावंडांना पेशवे पार्क तळ्यात नौकाविहार करता यायचा. पुढे काही दिवसांनी पेशवे पार्कमध्ये छोटी ट्रेन आली. ट्रेनचे नाव फुलराणी होते.

पुण्याचे कमिशनर कुलकर्णी यांच्या कल्पनेतून आत्ताची सुंदर व देखणी सारसबाग उदयास आली. बाजूच्या रिकाम्या जागी कचरा डंपिंग करून त्यावर माती टाकून पुणे स्पोर्टस क्लबची निर्मिती झाली.

माझे लग्न झाल्यानंतर आम्ही उभयतांनी दररोज सारसबागेत जाऊन श्री गजाननाचे दर्शन घ्यायचो. त्यानंतर एखाद्या बाकावर बसून आम्ही आमच्या भावी संसाराची स्वप्ने रंगवत तासनतास बसायचो. निघताना कल्पना भेळ खायची हा आमचा नित्याचा कार्यक्रम असायचा. मी देहभान विसरून भूतकाळातील गोड आठवणींमध्ये पूर्णपणे हरखून गेलो होतो.

तेवढ्यात सहा सात प्रौढ महिलांच्या हसण्याचा आवाज आला. त्या माझ्याकडेच येत असल्याचे मला जाणवले. त्यांचे बोलणे कानावर आले. "अगं मी ठामपणे सांगते सोमणांच्या वाड्यातील तो दशरथ भोसलेच आहे!"

माझ्यातला अहंकार जागा झाला. मी डॉक्टरेट आणि वर्ग एक निवृत्त अधिकारी, मला एकेरी नावाने हाक मारणाऱ्या या प्रौढा कोण असाव्यात? असा विचार करतोय तेवढ्यात एका महिलेने माझ्या पाठीत जोरात धपाटा मारला. सगळ्याजणी मनमुराद हसत होत्या. मी रागाने उभा राहिलो. पाठीत धपाटा मारणारी 'ती' मला म्हणाली, काय दशरथ मला ओळखलीस का?

मी त्या सर्व महिलांकडे पाहून आश्चर्यचकीतही झालो आणि मनापासून आनंदितही झालो. कित्येक वर्षांनी माझ्या बालपणीच्या मैत्रिणी भेटल्या होत्या. माझ्या पाठीवर थाप मारणाऱ्या तिला म्हणालो, "तू शेलारांची सरु ना." ती खूप हसली. मी म्हणालो, "सरु, तू वयाने वाढलीस, पण बालपणीचा तुझा खोडकर स्वभाव अजूनही तसाच आहे." वयाची पासष्ट पार केलेल्या माझ्या बालपणीच्या मैत्रिणींची मी नावे सांगितली. तू निकमांची उषा, तू मोरेंची मंदाकिनी, तू भगतांची सुमन, तू सारिका वाघोलीकर आणि तू चव्हाणांची सिंधू. मोरेंची मंदाकिनी म्हणाली, "दशरथ तुझी मेमरी शार्प आहे."

मी मंदाकिनीला सांगितले, आपण आजूबाजूच्या वाड्यात राहात असलो, तरी बालपण एकत्रच घालवले. पुणे म्युनिसिपालिटीच्या शाळेत सातवीपर्यंत एकत्रच शिकलो. पुढे अकरावीपर्यंत एकाच हायस्कूलामध्ये शिकलो. पुढे मी नोकरी निमित्ताने कोकणात स्थायिक झालो. निवृत्तीनंतर परत पुण्याला मुलांकडे राहायला आलो.

आम्ही बालपणात एकत्र खेळलो, वाढलो. पहिलीपासून अकरावीपर्यंत एकत्र शिकलो. पण आमच्या मनात प्रेम करावे अशी कल्पना कधीच मनात आली नाही. हल्लीची पिढी अधिक खुलेपणाने नातेसंबंध व्यक्त करते. दुसरी तिसरीत त्यांचे प्रेम प्रकरण सुरु होते. मग इयत्तावार हे प्रेम प्रकरण चांगलेच बहरते, रंगात येते.

जुन्या आठवणीतून सावरलो. आम्ही सर्वजण लॉनवर बसलो. बालपणीच्या गप्पागोष्टीत आम्ही रमून गेलो. शालेय जीवनातील त्या गोड आठवणींचा एकेक कप्पा हळुवार उलगडला जात होता. निखळ मैत्री होती आमची.

मला सध्या बराच मोकळा वेळ असल्याने आम्ही सर्वजण सारसबागेत जमायचो. मनमुराद गप्पा मारायचो. मंदाने सांगितले, मॅट्रिकनंतर आपण वेगवेगळ्या दिशेला गेलो. आमच्यापैकी काहीजणींनी कॉलेज केले. काही जणींनी नोकरी केली. पण आम्ही मैत्रिणी नशिबवान आहोत. आम्हा सर्वांना पुण्यातील जवळ जवळची स्थळे मिळाली. यथावकाश मुले झाली. त्यांना मोठे करण्यात, त्यांना व्यवस्थित शिक्षण देण्यात, त्यांची लग्ने करण्यात, आम्ही सर्वजण मुलांच्या, नातवंडांसाठी घरात राबतच राहिलो.

एकदा सुमनने चांगला पर्याय काढला. मी मुलाला आणि सुनेला समजावून सांगितले. लग्न होऊन मी या घरात आले. सासू-सासरे, दिर, नणंदा, मुले यासाठी अहोरात्र काबाडकष्ट करत राहिले. मलाही मन आहे. आता या वयात मला माझे उर्वरित आयुष्य मनासारखे जगायचे आहे. घरातील कामासाठी बाई ठेवा. तुमच्या मुलांची, संसाराची जबाबदारी आता तुम्ही सांभाळा. अगदीच एखाद्या वेळेस गरज पडली तर मी नातवंडांची जबाबदारी सांभाळेन. मुलांच्या मंजुरीचा प्रश्नच नव्हता. माझ्याप्रमाणे माझ्या सर्व मैत्रिणींनी समजूतदारपणे कटुता न येता मुलांच्या संसाराची जबाबदारी मुलांवर सोपवली.

मला एक जाणवले, या बालपणीच्या मैत्रिणी कमालीच्या सकारात्मक विचारांच्या आहेत. प्रत्येकीच्या आयुष्यातील चढउतार, अडचणी, संकटे, घरातील सून, मुले यांच्याबद्दलच्या कागाळ्या याचा त्या पुसटताही उल्लेख करत नाहीत. परमेश्वराने दिलेले उर्वरित आयुष्य मस्त मजेत जगायचे, आनंदात राहायचे. या बालपणीच्या मैत्रिणी सकाळी देवळात जातात. योगासनाच्या वर्गात जाऊन जमेल तेवढी योगासने करतात.

परमेश्वराने प्रत्येकीला काही विशेष गुण दिलेले आहेत. मंदाला गायनाची चांगली आवड आहे. आठवड्यातील एक दोन दिवस दुपारी मंदाच्या घरी जमतो. मंदाच्या गायनाचा आम्ही आस्वाद घेतो.

सारिकाचे ड्रॉइंग फार सुंदर आहे. गणपती उत्सव जवळ आला होता. सारिकाने सांगितले, मी तुम्हाला ड्रॉइंग शिकवणार आहे. सगळ्यांनी शंका काढली. आम्ही कित्येक वर्षांत साधा पेनही हातात घेतला नाही. ड्रॉइंग रंगवण्यासाठीचा ब्रश तर फारच दूरची गोष्ट आहे. सारिका जिद्दीला पेटली होती. तुम्ही चांगली चित्रे काढू शकता, माझी खात्री आहे.

एके रविवारी आम्ही सर्वजणी सारिकाच्या घरी जमलो. सारिकाने सर्वांना ड्रॉइंग पेपर, पेन्सिल, शार्पनर, खोडरबर, कॅम्लीनचे रंग, ब्रश प्रत्येकीला दिला. सारिका प्रत्येकाला प्रोत्साहन देत होती. कित्येक वर्षांत हातात पेन, पेन्सिल न घेतलेले हात ड्रॉइंग काढण्याचा प्रयत्न करत होते. आपण कसले चित्र काढले आहे ते काढणाऱ्यांनाही कळत नव्हते. कित्येक तासांनी ड्रॉइंग काढून झाली. सारिकाने गणपती उत्सवात "जेष्ठ रंगकर्मींनी चितारलेली मनीची चित्र प्रदर्शन" पाहायला या अशी जाहिरातबाजी केली होती. जाहिरात तर जोरदार झाली होती. आरती झाली. सारिकाने चित्र प्रदर्शनाचा हॉल उघडला. चित्र प्रदर्शन पाहायला येणारा प्रत्येकजण मनसोक्त हसत होते. परंतु ज्येष्ठ रंगकर्मी तर कधीच पसार झाले होते.

दर आठवड्याला आमची किटी पार्टी असते. हे सुमनच्या तोंडून ऐकताच मला शॉक बसला. ह्या वयात महिला किटी पार्टी करतात. डान्स करतात. मला आणखी आश्चर्य वाटले. मग सुमनने खुलासा केला. तू म्हणतोस तशी आमची किटी पार्टी नसते. सुकी भेळ आणतो. गप्पा मारतो, डान्स करतो, गाणी म्हणतो. आमचा डान्स सुरु झाला की, खालच्या मजल्यावरील कुलकर्णी आजोबा वर येऊन बंद करा तुमचा धांगडधिंगा, मला त्रास होतो म्हणतात. मग समोरचे भिलारे काका येतात, तुमच्या हसण्याचा, गाण्याचा मला त्रास होतो. तेव्हापासून सारसबागेतील लॉनवर आमची किटी पार्टी रंगते. काही समवयस्क आमच्या किटी पार्टीत जॉईन होतात. शेलारांची सरु गोधड्या फार छान तयार करायची. घरातील शिलाई मशीनवर जुन्या साड्या, ओढणी वगैरे जुन्या कपड्यांतून, कधी नवीन कापडाचे तुकडे एकत्र करून छान गोधड्या करते. आम्ही ठरवले सरुच्या मदतीने आपणही छान छान गोधड्या तयार करू. प्रत्येकीकडे दोन चार गोधड्या शिवून तयार झाल्या. थंडी सुरु झाली होती. एक कल्पना सुचली. आपण प्रदर्शन भरवू. "आजीची गोधडी" सर्वांनीच कल्पना उचलून धरली. चौकाचौकात बोर्ड लागले, "आजीची गोधडी" विक्री केंद्र सुरु झाले आहे. विक्री केंद्रात आकर्षक पद्धतीने मांडणी केली. पब्लिक यायचे, बघायचे परंतु मॉडर्न मॉमच्या पसंतीस येईनात. शेवटी आम्ही शिवलेल्या आजीच्या गोधड्या वृद्धाश्रमातील वृद्धांना मोफत वाटल्या. आजीची गोधडी विकून मिळणाऱ्या पैशापेक्षा वृद्धांच्या डोळ्यातील कृतज्ञतेचा भाव, चेहऱ्यावरील आनंद आम्हाला जास्त भावला. आमच्या कष्टाचे चीज झाल्याचे समाधान वाटले.

सामाजिक बांधिलकीच्या भावनेतून आम्ही खूपशा राख्या करतो, असे उषाने सांगितले. तयार राख्या सरहद्दीवर लढणाऱ्या आमच्या जवानांसाठी पाठवतो. शहरातील ट्रॅफिक पोलिस बंधूंनाही आम्ही राखी बांधतो. दिवाळीचा फराळ केल्यावर फराळाचे बॉक्सेस सोसायटीतील कचरा वेचक, वॉचमन यांना देतो. त्यावेळेस त्यांच्या चेहऱ्यावर फुलणाऱ्या आनंदाचे मोजमाप कशातच करता येणार नाही. दसऱ्यात आम्ही फेर धरुन भोंडला खेळतो. फुगड्या खेळतो.

मला गावी परत यायचे असल्याने नाईलाजाने वर्गमैत्रिणींचा निरोप घेतला. मनात विचार येत होता, सकारात्मक विचारामुळे त्या सदैव आनंदी असतात. त्यांचे घरही हसरे असते. भारतीय संस्कृतीत स्त्रियांकडे मातृरुपाने, शक्तीरुपाने बघितले जाते. स्त्री समर्पणवृत्तीने चंदनागत झिजणारी कुटुंबातील आश्वासक आधार म्हणजे स्त्री. पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रीला तिच्या मनाप्रमाणे जगता येते का, तेवढे स्वातंत्र्य तिला मिळते का, हा विचार मनात रुंजी घालू लागला. विचार केला, माझ्या वर्गमैत्रिणींवर एक लेख लिहावा. अनेक प्रौढ महिलांना त्याचे स्वतंत्र जीवन जगता येईल.

समारोप:

या आठवणींमधून एक गोष्ट स्पष्ट होते की, खरी संपत्ती म्हणजे निखळ मैत्री, सकारात्मक विचार आणि आयुष्याचा आनंद घेण्याची वृत्ती. जबाबदाऱ्या पूर्ण केल्यानंतर स्वतःसाठी जगणेही तितकेच महत्त्वाचे आहे. जीवनातील लहान-लहान क्षणांमध्ये आनंद शोधता आला, तर आयुष्य अधिक सुंदर होते. समाजासाठी काहीतरी देण्याची भावना आणि एकमेकांशी जोडलेले राहणे हेच खऱ्या समाधानाचे गमक आहे.

**डॉ. दशरथ भोसले, विनोदी कथा लेखक, दापोली जिल्हा रत्नागिरी.**

# "जल ही जीवन, जल ही अमृत" संपूर्ण सृष्टीसाठी पाण्याचा एक-एक थेंब महत्त्वाचा

आज जगात पाणी हा महत्वाचा घटक आहे.कारण जल नहीं तो कुछ नहीं! पृथ्वीतलावर मानवजातीच्या अतीरेकामुळे आज निसर्गाचे संतुलन डगमगतांना दिसत आहे. अन्न, वस्त्र, निवारा याची मुख्य जळ-मुळ पाणी आहे.कारण पाण्याशिवाय कोणतीही गोष्ट शक्यच नाही.भारतासह अनेक देशांमध्ये दरवर्षी पाण्याचा हा!हा!कार! होतांना आपण पाहतो.भारतात मार्च महिन्यापासुनच देशातील अनेक भागांत पाण्याची समस्या निर्माण होत असते.आजही अनेक देश पाण्यासाठी कडवी झुंज देत आहे. आज आपण कुठेही गेलो तरी पाणी अती आवश्यक आहे.आकाश-पाताळ,पुर्व-पश्चिम, उत्तर- दक्षिन म्हणजेच आपण जगाच्या पाठीवर कुठेही गेलो तरी मानव, पशु-पक्षी व संपूर्ण जीवजंतू हे पाण्याविना जगुच शकत नाही.पाण्याविना निसर्ग नाही व मानवही नाही.म्हणजेच आज पाणी सर्वांसाठीच अनमोल आहे.त्यामुळे पाण्याचे महत्व सर्वांनीच लक्षात ठेवले पाहिजे.1992 ला पर्यावरण व विकास या विषयावर संयुक्त राष्ट्र संमेलन आयोजित करण्यात आले होते.यावेळेस विश्र्व जल दिवस या विषयावर चर्चा करण्यात आली व संयुक्त राष्ट्र संघानेने प्रत्येक वर्षी 22 मार्चला विश्व जल दिवस साजरा करण्याचे जाहीर केले. यानंत 1993 मध्ये 22 मार्चला संपूर्ण जगात विश्र्व जल दिवस पहिल्यांदा साजरा करण्यात आला.यावेळेस जल संरक्षण आणि रख-रखाव यावर जनजागृतीचे मोठे अभियान छेडण्यात आले.विश्व जल दिवसाला पाणी वाचविण्याचा "संकल्प" दिवस सुध्दा म्हटल्या जाते.या दिवसाला पाणी संरक्षणा विषयी जागृकता व पाण्याचे महत्व याला जास्त महत्त्व दिले जाते. आज मानवाच्या जीवनाचा महत्वाचा घटक म्हणजे पाणी आहे.कारण पाण्याविना संपूर्ण सृष्टीअधुरी आहे.आपण जगाच्या भुभागाचा विचार केला तर या पृथ्वीतलावर 70 टक्के पाणी व 30 टक्के भुभाग आहे.तरीही जगात पीण्याच्या पाण्याची समस्या अत्यंत गंभीर असल्याचे दिसून येते.कारण 70 टक्के समुद्राचे पाणी खारे असल्यामुळे पीण्यायोग्य नाही. सध्या संपूर्ण जग अत्याधुनिक युगाकडे वाटचाल करतांना दिसते.त्यामुळे जगात अनेक नवीन नवीन समस्या उदयास येतांना दिसतात. त्यामुळे आज संपूर्ण जगात पीण्याच्या पाण्याची समस्या मोठ्या प्रमाणात दिसून येते. याचे मुख्य कारण म्हणजे बदलते हवामान व जगातील वाढती लोकसंख्या यामुळे जगातील 50 टक्के जंगलसंपदा मानवाच्या अतिरेकामुळे नस्तनाबुत झाली आहे. त्यामुळे पावसाचे पाणी जमिनीत न मुरता ते सरळ समुद्रात जात आहे. यामुळे आज जगात अत्यंत गंभीर समस्या निर्माण होऊन दिवसेंदिवस समुद्राची पातळी वाढत आहे. समुद्राची पातळी वाढने म्हणजेच पृथ्वीतलावरील संपूर्ण सृष्टीच्या बाबतीत धोक्याची घंटा आहे.त्यामुळे पाण्याचा विषय साधा नसुन अत्यंत गंभीर आणि चिंतेचा विषय आहे.जगात वाढते कारखाने, औद्योगिकीकरण, शहरीकरण, युद्धजन्य परिस्थिती, अनेक परमाणु परिक्षण यामुळे निसर्गानचे संतुलन डगमगतांना दिसत आहे.कारखाण्यांच्या दुषीत वातावरणामुळे व तापमानामुळे अनेक हिमकडे कोसळताना आपण पहातो. यामुळे संपूर्ण जगात महाप्रलय, सुनामी आल्याचेसुध्दा आपणासर्वांना ग्यात आहे.जगातील हिमकडे साबुत रहाले तर पाण्याची समस्या आपोआप कमी होईल.परंतु मानवाने स्वतःच्या स्वार्थासाठी हिमकड्यांचा बळी घेतांना दिसत आहे. अनेकदा देवभुमित आलेला महाप्रलय हा हिमकडा कोसळल्याने आलेला महाप्रलय आहे.संपुर्ण भारतात 80 टक्के पीण्यायोग्य पाणी हिमकड्यातुन मीळत असते.परंतु मानवाच्या अतीरेकामुळे हिमकडे वेळेच्या आधी वितळायला लागले तर या पृथ्वीतलावर 20 वर्षांनंतर पीण्याकरीता एक थेंब सुध्दा पाणी मिळणार नाही.त्यामुळे पाणी वाचविण्यासाठी तळागाळातुन प्रयत्न व्हायलाच पाहिजे.आज जंगलातील संपूर्ण हिंसक पशु शहरांकडे का येत आहे.याचा विचार कोणीच करीत नाही.परंतु जगातील संपूर्ण मानवजातीने हे लक्षात ठेवले पाहिजे की,जंगलातील हिंसक पशु-पक्षी शहरात येत नसुन आपण त्यांच्या घरावर म्हणजेच जंगलावर अतिक्रमण करीत आहोत. त्यामुळे जंगलातील पशु-पक्षी शहरात व गावात येतांना दिसतात.पुर्वी छोटे-छोटे तलाव असायचे.परंतु आज पुर्विचे छोटे-छोटे तलाव वस्ती व कारखाण्यामध्ये परीवर्तीत झालेले दिसुन येतात.त्यामुळे आज गावात, शहरात,वस्तीत संपूर्ण ठिकाणी पीण्याच्या पाण्याची समस्या मोठ्या प्रमाणात भेडसावतांना दिसून येते.याचे मुख्य कारण म्हणजे मानवाने निसर्गावर केलेला अत्याचार होय. सध्याच्या काळात जगामध्ये आगजनीच्या घटना व वनवेलागने मोठ्या प्रमाणात दिसून येतात.अनेक मोठमोठी जंगले अजुनही जळत आहे.कारण मानवाने जमीनीच्या पोटातील पाणी संपूर्णतः निचोडुन (आटवुन) टाकले आहे.जगातील अनेक भागात ज्वालामुखीचा उद्रेक मोठ्या प्रमाणात होतांना आपण पहातो.भुकंप,सुनामी, ज्वालामुखीचा उद्रेक ह्या संपूर्ण घटना पृथ्वीतलावर पाण्याची पातळी कमी होत असल्याने होत आहे. कारण जंगलसंपदा टीकुन रहाली असती तर पाण्याची समस्या मुळातच रहालीच नसती.पाणी टीकुन रहाले असते तर ज्वालामुखी, सुनामी, महाप्रलय,भुकंप,वनवे लागने इत्यादी विनाशकारी घटनांचा उद्रेक झाला नसता. अजुनही मानवजाती पाण्याचे महत्व समजल्याचे दिसून येत नाही.पुर्वी नदी,ओढे, तलाव,झिरा व विहिरीतून पाणी घ्यायचे परंतु आता नदी,तलाव व विहिरी आटुलागल्या आहेत. विहीरीची खोली 50 ते 60 फुटांपर्यंत असायची परंतु पाण्याचा दुष्काळ पहाता 50 ते 60 फुटांपर्यंतचे विहिरीचेसुध्दा पाणी आटल्याचे दिसून येते.त्यामुळे आता मानवजातीने बोरवेलचा सहारा घेऊन 500 ते 700 फुटांवर पाण्यासाठी जावे लागत आहे. मनुष्याला पाण्याचा अधिकार फक्त 50 ते 60 फुटांपर्यंतच होता.परंतु मानवाने पाण्यासाठी संपूर्ण सीमा ओलांडून पाताळात जाऊन तेथील पाण्यावर अतीक्रमन केल्याचे दिसून येते. म्हणजेच मानवाने सापाच्या बिळात हात टाकला आहे.ज्या पाण्यावर मानवजातीचा तिळमात्र अधिकार नाही तेही पाणी आपण आपली तहान भागवण्यासाठी वापरीत आहोत. हा मानवाचा निसर्गसृष्टीवर खुला अन्याय व अत्याचार नाही काय?आज मानवाच्या निष्काळजीपणामुळे व अतिरेकामुळे जंगले वाळुन (सुकली)गेली आहे.आज संपूर्ण जग बारूदच्या ढीगाऱ्यावर बसले आहे ही बाब सर्वांनाच ग्यात आहे.अनेक देशात गृहयुद्ध व आता महायुद्ध सुरु आहे.उदाहरण द्यायचे झाले तर रशिया -युक्रेन,अमेरिका-इजरायल-इराण-गाजा-इराण-हिज्बुला यांनी महायुद्धाचे स्वरुप घेतले आहे यामुळे युद्धाने जनुकाय रक्ताची नदी वाहत आहे की काय असे वाटत आहे. सध्याच्या परिस्थितीत या देशात आगडोंब उसळला असुन अनेक क्षेत्र जळुन खाक झाले आहे.त्याचप्रमाणे अनेक देश परमाणुपरीक्षण करतांना आपण पहातो.अशा परीस्थितीत भुमाता(पृथ्वी) पाण्याचे संग्रहन कसे काय करेल? मानव आज आगीशी खेळत आहे त्यामुळे तो पाण्याचे महत्व विसरल्याचे दिसून येते.कठीण परिस्थिती पाहता जगाने पाणी वाचवीण्याचा संकल्प करायला पाहिजे. अन्न,वस्त्र,निवारा आवश्यक आहे यात दुमत नाही.परंतु अन्न,वस्त्र, निवारा यांची उत्पत्ती ही पाण्यापासूनच होत असते.त्यामुळे भारतासह संपूर्ण जगाने विश्व जल दिवस साजरा करतांना पाण्याचे महत्व समजुन घेतले पाहिजे.जगापुढे शुद्ध पाण्याची गंभीर समस्या आहे. पाण्यासाठी अनेक देशांमध्ये हा!हा!कार! माजल्याचे दिसून येते.त्यामुळे पाणी वाचविण्यासाठी भारतासह संपूर्ण जगाने युद्ध पातळीवर प्रयत्न करण्याची गरज आहे.पर्यावयण व निसर्ग सुरक्षित तर पाणी सुरक्षित. पाणी सुरक्षित तर मानव, पशुपक्षी,जीव-जंतु सुरक्षित,जिव सृष्टी सुरक्षित तर पृथ्वी सुरक्षित ही बाब सर्वांनीच लक्षात ठेवली पाहिजे.आज अनेक देशांतील जंगल संपदा नस्तनाबुत करून कारखाने,शहरे मोठ्या प्रमाणात उभारले आहे.त्यामुळे भारतातच नव्हे तर संपूर्ण जगात जंगलातील हिंसक प्राणी (वाघ,अस्वल, सिंह, कोल्हा, बिबट्या, जहरीले साप) शहरात शिरकाव करतांना दिसतात. यामुळे मोठ्या प्रमाणात जिवीत हानी सुध्दा झाली आहे व होत आहे.याचे मुख्य कारण म्हणजे जंगलातील पाण्याचा तुटवडा होय. आज पाण्यासाठी मानव व प्राणी एकमेकांचे कट्टर शत्रू बनल्याचे दिसून येते.त्यामुळे संपूर्ण जगाने पाणी वाचविण्याचा संकल्प केला पाहिजे.असे भाकीत आहे की 2040 मध्ये भारतात प्यायला पाणी मिळणार नाही.अशी स्थिती येवू शकते याला नाकारता येत नाही. संयुक्त राष्ट्राने जगातील पाण्याच्या परीस्थितीच्या अहवालामध्ये ही भीती वर्तवली आहे.जगात पुढे पाण्याचे भीषन संकट येणार असून भारत या संकटाच्या केंद्रस्थानी रहाण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.नद्या, सरोवर, तलाव यामध्ये उपलब्ध असलेले पीण्याचे पाणी झपाट्याने प्रदुषित होत आहे. त्यामुळे कारखान्याचे दुषितपाणी व सांडपाणी यांना पीण्याच्या पाण्यापासून कोसो दूर ठेवण्याची गरज आहे.दूषित पाणी पील्यामुळे जगात दरवर्षी लाखोच्या संख्येने मानवीय हाणी व पशुपक्षांची हाणी मोठ्या प्रमाणात होतांना दिसुन येते यालाही थांबविण्याची गरज आहे. एकावर्षात पडलेले पावसाचे पाणी अडवीता आले तर पाच वर्षे पुरेल इतका पाणी साठा आपल्याला उपलब्ध होवू शकतो. परंतु त्यासाठी योग्य नियोजन करणे अजुनही आपल्याला जमले नाही.आताही 80 टक्के पाणी प्रदूषित आहे.पाण्याच्या स्त्रोतांचे होणारे प्रदुषण आणि पाणी साठविण्यासाठी नसलेले नियोजन हे दोन प्रश्न आहेत.यावर दुर्लक्ष सुरुच राहील्यास येणाऱ्या काही वर्षांत पिण्याच्या पाण्याची समस्या निर्माण होवू शकते असा इशारा पर्यावरण तज्ज्ञांचे दिला आहे.मानव हा बुध्दीजीवी प्राणी आहे त्यामुळे हे लक्षात ठेवले पाहिजे की पाणी संपले तर आपण संपु,आपण संपलो तर जग संपेल! त्यामुळे विश्र्व जल दिनाच्या निमित्ताने प्रत्येकांनी पाणी वाचविण्याचा "संकल्प" केला पाहिजे. तेव्हाच पाणी वाचेल.त्याचप्रमाणे "पाणी वाचवा देश वाचवा" हा निर्धार संपूर्ण जगाने अंगीकारला पाहिजे.आज जगातील वाढती पाण्याची समस्या यामुळे अनेक पशुपक्षी लुप्त झाल्याचे दिसून येते. याकरीता जल विश्र्व दिनाच्या निमित्ताने वाढते प्रदुषण रोखण्याचा व पाणी वाचविण्याचा निर्धार सर्वांनीच अंगीकारला पाहिजे.

लेखक
रमेश कृष्णराव लांजेवार
(स्वतंत्र पत्रकार)
मो.नं.9921690779, नागपूर.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक मोहन भागुजीराव व्हावळे यांनी मातोश्री ऑफसेट मोंढा जवळ, परळी वैजनाथ, परळी ता. परळी, जि.बीड 431515 (महाराष्ट्र ) येथे छापून साप्ताहिक परळी संघर्षनेता, कार्यालय, मोहन भागुजीराव व्हावळे, इंदिरा नगर ता. परळी वैजनाथ जि.बीड पिन कोड 431515 (एम.एस.) येथे प्रकाशित केले आहे. मोबा. 9881265102, पीआरबी ॲक्ट नुसार या अंकातील प्रकाशित झालेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. या संबंधीत वाद परळी वैजनाथ न्यायालया अंतर्गत parlisangharshneta@gmail.com , mohanvhavale1111@gmail.com

## पान 1 वरुन

सत्ताधारी आमदारांच्या संबंधित आहे. आमच्या काही आमदारांनी सत्ताधाऱ्यांचे अनेक प्रकरणं बाहेर काढले आहेत. यामध्ये भ्रष्टाचाराचे प्रकरणे देखील समोर आणले आहेत. मी आता मागच्या एक पत्रकार परिषदेत बोलताना म्हटलं होतं की मुख्यमंत्र्यांनी अजून एक पांघरुण खातं निर्माण केले पाहिजे. सगळ्यांच्या पापांवर पांघरुण घालणं, हे खातं मुख्यमंत्र्यांनी स्वत:कडे ठेवलं पाहिजे, असं म्हणत उद्धव ठाकरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावरही टीका केली.

-----------------------------------

माझी सुनेत्रा पवार यांनी रुपाली चाकणकर यांची राष्ट्रवादीच्या प्रदेशाध्यक्षपदावरुन हकालपट्टी करावी,” अशी मागणीही त्यांनी केली. अशोक खरात याचे संबंध अनेक मंत्री, राजकारण्यांशी आहेत. त्यामुळे अनेकांचे पितळ उघडे पडू शकते. त्याचे अनेक राजकीय नेत्यांशी संबंध आहेत. हे संबंध पुढे येऊ शकतात. म्हणूनच अशोक खरात याला संपवण्याचा कट रचला जाऊ शकतो, असा दावा तृप्ती देसाई यांनी केला. तसेच मला नाशिकहून काही पीडित महिलांचा फोन आला होता. 24 मार्चपर्यंत अशोक खरातला पोलीस कोठडी मिळालेली आहे. 24 तारखेला त्याला न्यायालयापुढे हजर करताना त्याचे एन्काऊंटर होऊ शकते. हे प्रकरण पूर्णपणे बंद केले जाऊ शकते, अशीही पुष्टी त्यांनी जोडलीअशोक खरातने मोठा कांड केलेला आहे. त्याने अनेक महिलांचे लैंगिक शोषण केलेले आहे. त्याला तातडीने संपवून चालणार नाही. त्याला प्रत्येक दिवशी शिक्षा मिळाली पाहिजे. त्याचे एन्काऊंटर करण्याचा डाव असेल तर तो उधळून लावला पाहिजे, असे म्हणत त्यांनी मुख्यमंत्र्यांनी यात लक्ष घालावे अशी मागणी केली.

--------------------------------

की, “माझे पती हे तज्ज्ञ अथवा व्यावसायिक ज्योतिषी नाहीत. त्यांच्या जवळच्याच सहकाऱ्यांनी त्यांचा घात केला असून समाजात असलेली त्यांची प्रतिमा उद्ध्वस्त करण्यासाठी हे कारस्थान रचलं गेलं आहे,” अशी प्रतिक्रिया कल्पना अशोक खरात यांनी दिली आहे. ‘हिंदुस्थान टाईम्स’नं याबाबत वृत्त दिलं आहे.दरम्यान, अशोक खरात आणि त्याची पत्नी कल्पना खरात हे दाम्पत्य स्वयंघोषित अध्यात्मिक गुरु म्हणून समाजात वावरत होते. कारण गुरुपौर्णिमेनिमित्त या दोघांचंही पाद्यपुजन सोहळ्याचे फोटो समोर आले आहेत. त्याचबरोबर खरातनं जी काही माया अर्थात पैसा जमा केला आहे तो त्यानं आपल्या पत्नीसह दोन मुली आणि जावयाच्या नावे केल्याचंही समोर आलं आहे. कोट्यवधी रुपयांचे भूखंड, हार्डवेअरचं भलंमोठं शोरुम त्याचबरोबर आलिशान फार्म हाऊस, विविध ठिकाणी केलेली गुंतवणूक अशी बरीच मोठी संपत्ती त्यानं आपल्या नातेवाईकांच्या नावावर केली आहे.अशोक खरात याला आध्यात्मिक गुरु मानलं असल्यानं त्याच्याशी संबंधित अनेक धार्मिक कार्यक्रमांमध्ये राज्य महिला आयोगाच्या माजी अध्यक्षा रुपाली चाकणकर यांचे फोटो समोर आले आहेत. त्याचबरोबर अशोक खरात अध्यक्ष असेलल्या शिवनिका संस्थान ट्रस्टच्या एका ट्रस्टी म्हणून देखील रुपाली चाकणकर या कार्यरत होत्या. त्याचबरोबर 2022 मध्ये नाशिकच्या एका स्थानिक वर्तमानपत्रानं खरातच्या काळ्या कारनाम्यांबाबत बातमी दिल्यानं खरातची कथित बदनामी केल्याप्रकरणी त्या वर्तमानपत्राला कारणे दाखवा नोटीस पाठवून दबाव आणल्याचा आरोपही रुपाली चाकणकर यांच्यावर झाला. यासर्व प्रकारामुळं अखेर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी चाकणकर यांना राजीनामा देण्याचे निर्देश दिले आणि त्यानंतर त्यांची राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदावरुन गच्छंती झाली.

------------------------------

प्रक्रियेचा मी एक भाग होतो’, असं चंद्रकांत पाटील यांनी म्हटलं आहे.“जयंत पाटलांच्या भाजपा प्रवेशाचे संजयकाका पाटील हे फक्त साक्षीदार आहेत. मात्र, मी त्या प्रक्रियेतील ‘पार्ट अँड पार्सल’ आहे. त्यामुळे आता मला जास्त बोलायला लावू नका. जयंत पाटील मला नेहमी उपरोधीकपणे म्हणतात की मी त्यांचा मित्र आहे. तसं जयंत पाटील देखील माझे मित्रच आहेत. त्यामुळे एवढ्या ओपन बोलायला नको. अन्यथा त्यांना त्रास होईल”, असं मंत्री चंद्रकांत पाटील यांनी म्हटलं आहे. सांगली जिल्हा परिषदेच्या निवडणुकीनंतर आमदार जयंत पाटील यांनी संजयकाका पाटील यांच्यावर खोचकपणे टीका केली होती. त्या टीकेला प्रत्युत्तर देताना संजयकाका पाटील म्हणाले होते की, “जयंत पाटील स्वतः भाजपामध्ये जाण्यासाठी आग्रही होते. त्यासाठी त्यांनी किती वेळा उंबरे झिजवले याचा मी स्वतः साक्षीदार आहे”, असं संजयकाका पाटील यांनी म्हटलं होतं.सांगली जिल्हा परिषदेची निवडणूक काही दिवसांपूर्वीच पार पडली. या जिल्हा परिषदेत महाविकास आघाडीने भाजपाचा पराभव केला. या निवडणुकीनंतर बोलताना जयंत पाटील यांनी संजयकाका पाटील यांच्यावर जोरदार टीका केली होती. यावेळी बोलताना जयंत पाटील म्हणाले होते की, “संजयकाका पाटील यांना आपणच भाजपामध्ये पाठवलं होतं. त्यांनी पलिकडे जाऊन आम्हालाच मदत केली, यामुळे आम्हाला नव्याने रणनीती आखण्यात मदत झाली”, असा दावा जयंत पाटील यांनी केला होता.

---------------------------------

भेट घेउन शुभेच्छा दिल्या आणि शीरखुर्मा चा आस्वाद बांधवांसोबत घेतला. हा स्नेहभाव गेल्या तीस वर्षापासून त्यांनी जपला आहे.

यावेळी महेश बँकेचे अध्यक्ष ओमप्रकाश सारडा, शिवसेनेचे नेते राजा भैय्या पांडे, सूर्यकांत मुंडे, प्रा.विजय मुंडे,शाम गडेकर, जिल्हा परिषद सदस्य प्रदीप भैय्या (बबलू शेठ)मुंडे, बाबासाहेब शिंदे, नवनाथ क्षीरसागर, विश्वनाथ गायकवाड, रघुनाथ डोळस, राहुल कांदे,शिवा बडे, हनुमंत गुट्टे, भोपल्याचे सरपंच बाळासाहेब मुंडे, श्रीमंत कांगणे, ब्रह्मदेव मुंडे,माणिक बनसोडे,महादेव दौंड,केशव फड, वृक्षराज आंधळे, पिंटू देवडे, अरुणाचल रोडे, पांडुरंग निकते, प्रवीण घाडगे, अण्णा सरवदे आदीसह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

-----------------------------------------

यांनी सरकारला चांगलंच घेरलं आहे. त्यांनी दीपक केसरकर यांचे नाव घेत अशोक खरातप्रकरणी गंभीर आरोप केले आहेत. त्यानंतर आता दीपक केसरकर यांनी समोर येत राऊतांनी केलेल्या आरोपांवर स्पष्टीकरण दिले आहे. तसेच अशोक खरातसोबत जोडण्यात येत असलेल्या संबंधांवरही त्यांनी स्पष्टीकरण दिले आहे.अशोक खरातचे प्रकरण समोर आल्यानंतर संजय राऊत यांनी सरकार तसेच सत्ताधारी पक्षातील खाही नेत्यांवर गंभीर आरोप केले आहेत. हे आरोप करताना त्यांनी दीपक केसरकर यांचे थेट नाव घेतले आहे. पत्रकार परिषदेत बोलताना दीपक केसरकर शिक्षणमंत्री असताना शिक्षण खात्यातील अनेक महत्त्वाच्या बदल्या, बढत्या, इतर कामं करताना हे अशोक खरात बाबा लक्ष घालायचे. अनेक अधिकाऱ्यांची बदली, बढती करण्यासाठी हे बाबा दीपक केसरकर यांना सांगायचे. ट्रायटन्ट हॉटेलमध्ये बोलवून ही सगळी कामे करुन घेतली जायची. शिक्षण खातं हे खरात बाबाकडून चालवले जायचे, असा गंभीर स्वरुपाचा आरोप संजय राऊत यांनी केला. दीपक केसरकर यांनी एका व्हिडीओच्या माध्यमातून त्यांची भूमिका स्पष्ट केली आहे. कॅप्टन खरात यांना ज्या गंभीर आरोपाखाली अटक झाली आहे, त्या कृत्याचा मी तीव्र शब्दात निषेध करतो. या प्रकरणाची सखोल चौकशी होऊन न्यायालय योग्य तो निर्णय घेईल, असे केसरकर म्हणाले आहेत. तसेच कॅप्टन खरात यांच्याशी माझी ओळख केवळ राजकीय किंवा वैयक्तिक कारणातून नाही, तर सिन्नर येथील ईशानेश्वर मंदिराच्या कामामुळे झाली. या मंदिराच्या रस्त्यासाठी त्यांनी केलेल्या पाठपुराव्यामुळे आमची भेट झाली होती, असेही केसरकर यांनी सांगितले. खरात यांचा अ‍ॅस्ट्रॉनॉमी (खगोलशास्त्र/ज्योतिषशास्त्र) मध्ये चांगला अभ्यास असल्याने माझ्यासारख्या अनेक लोकांची त्यांच्याशी केवळ त्या विषयापुरती ओळख आहे. समाज माध्यमांवर फिरत असलेले फोटो हे ईशानेश्वर मंदिराच्या कामाच्या संदर्भातील किंवा त्यांच्या मुलीच्या लग्नातील आहेत. एखाद्या ओळखीच्या व्यक्तीच्या निमंत्रणावरुन लग्नाला जाणे किंवा शुभेच्छा देणे हा सामाजिक शिष्टाचार आहे, असे सांगत त्यांनी या फोटोंचा वैयक्तिक प्रकरणांशी संबंध जोडू नये, असे आवाहनही त्यांनी केले.संजय राऊत यांनी केलेले आरोप बिनबुडाचे आहेत. कॅप्टन खरात कधीही माझ्या कार्यालयात आलेले नाहीत, त्यामुळे ते माझे विभाग चालवत होते असे म्हणणे पूर्णपणे चुकीचे आहे. माझ्या कार्यकाळात शिक्षण आणि मराठी भाषा विभागात जे ऐतिहासिक निर्णय झाले, ते क्वचितच इतर कोणत्याही मंत्र्यांच्या काळात झाले असतील. त्यामुळे विभागाच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह उपस्थित करणे चुकीचे आहे. केवळ फोटोंच्या आधारे कोणत्याही राजकीय व्यक्तीचा या प्रकरणाशी संबंध जोडून चुकीची प्रसिद्धी देऊ नये, असे केसरकर म्हणाले आहेत.

---------------------------------------

हर्षवर्धन सपकाळ यांनी भाजपचे अहिल्यानगरमधील मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे माध्यमांवर फोटो शेअर करत, साधलेल्या टायमिंगने खळबळ उडवून दिली आहे.

काँग्रेस (Congress) प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी, भाजपचे अहिल्यानगरचे पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी भोंदूबाबा कॅप्टन अशोक खरात याच्या संस्थानमधील मंदिरात केलेल्या पुजेचा फोटो एक्स खात्यावर पोस्ट शेअर करत काही प्रश्न विचारले आहेत. हर्षवर्धन सपकाळ यांनी एक्सवर मंत्री विखे पाटलांचा (Radhakrishna Vikhe Patil) फोटो पोस्ट करताना, महायुती सरकारमधील मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांना विकृत बलात्कारी अशोक खरातच्या काळ्या कारनाम्यांविषयी माहिती होती, असं ते म्हणतात. पण मग त्यांना माहिती होती तर, ते त्याच्या संस्थानात असलेल्या मंदिरात पुजा करण्यासाठी गेलेच का? असा प्रश्न केला आहे.की आजपर्यंत त्याच्या माध्यमातून सगळे फायदे उचलून आज काळे कारनामे बाहेर आल्यामुळे अगोदरच काढता पाय विखे पाटीलजी आपण घेत आहात का? असा खळबळजनक प्रश्न केला आहे. हर्षवर्धन सपकाळ यांनी साधलेल्या या टायमिंगमुळे मंत्री विखे पाटील यांच्या अडचणी वाढू शकमंत्री विखे पाटील यांच्याशेजारी एकनाथ शिंदे शिवसेनेचे माजी मंत्री दीपक केसरकर हे देखील दिसतात. सपकाळ यांनी समाज माध्यमांवर शेअर केलेल्या या फोटोमुळे चर्चांना तोंड फुटलं आहे. दरम्यान, मंत्री विखे पाटील यांनी नाशिकच्या खरात प्रकरणावर शिर्डी इथं प्रतिक्रिया दिली आहे.तात.माजी मंत्री दीपक केसरकर यांचा निकटवर्तीय दीपक लोंढे याची या प्रकरणात चौकशी होणार आहे, यावर मंत्री विखे पाटील यांनी प्रतिक्रिया देता म्हटले की, “सर्व चौकशी होईल. एसआयटी स्थापन केली आहे. पोलिस अधीक्षक तेजस्विनी सातपुते मॅडम यांच्या नेतृत्वात एसआयटी आहे. कोण दलाल होते, कोणी काय भानगडी केल्यात, सर्व बाहेर येईल.”

----------------------------------------

नगर परिषद पाणी पुरवठा विभाग नेहमी तत्पर असल्याचेही पाणी पुरवठा सभापती सौ.जयश्रीताई रवींद्र गित्ते यांनी सांगितले.

परळी वैजनाथ शहरातील पाणीपुरवठा अधिक सक्षम व नियमित करण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल टाकत, पवित्र रमजान ईदच्या मंगलमय दिवशी प्रभाग क्रमांक 17 मधील मलिकपूरा परिसरात नवीन सहा किलोमीटर लांबीच्या पाणीपुरवठा पाइपलाईनचे (4 इंच व 6 इंच) शुभारंभ नगर परिषदेच्या पाणीपुरवठा सभापती सौ. जयश्रीताई रवींद्र गित्ते यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून उत्साहात करण्यात आले. आ. धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली साकारलेल्या या योजनेमुळे शहरातील व परिसरातील नागरिकांना दिलासा मिळणार आहे. या प्रसंगी प्रभागातील नगरसेवक हाजी बाबू, नगरसेवक रमेश पवार,सद्दिक भाई, असद भाई, अन्सार भाई,सम्मू भाई, रशीद भाई तसेच स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. नव्याने टाकण्यात येत आसलेल्या पाइपलाईनमुळे मलिकपूरा भागात पाण्याचा दाब वाढून अधिक नियमित व सुरळीत पाणीपुरवठा होणार आहे.

यावेळी बोलताना सौ.जयश्रीताई गित्ते यांनी सांगितले की, परळी वैजनाथ शहरातील पाणीपुरवठा नियमित सुरळीत सुरु असून काही भागांमध्ये निर्माण होणाऱ्या अडचणी मागणीनुसार तातडीने दूर करण्यात येत आहेत. शहरातील प्रत्येक घरापर्यंत शुद्ध व पुरेसा पाणीपुरवठा पोहोचविण्या साठी नगर परिषद पाणीपुरवठा विभाग कटिबद्ध आहे. कोणत्याही परिस्थितीत शहराला पाणी कमी पडू दिले जाणार नाही, अशी ठाम ग्वाही त्यांनी दिली. उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी पाणी जपून वापरावे, पाण्याचा अपव्यय टाळावा आणि प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहनही पाणी पुरवठा सभापती सौ.जयश्रीताई रवींद्र गित्ते यांनी केले.

---------------------------------------

जाऊ शकतील. ही माहिती केवळ मोठ्या शहरांपुरती मर्यादित राहू नये, तर लहान शहरे आणि वस्तींपर्यंत पोहोचावी असा सरकारचा प्रयत्न आहे. जेणेकरुन प्रत्येक करदात्याला समान माहिती मिळू शकेल.

(डिस्क्लेमर: या आर्टिकलमध्ये देण्यात आलेली माहिती व उपाय हे सामान्य ज्ञानावर आधारित आहेत. आमचा याला दुजोरा नाही. ते अवलंबण्यापूर्वी तज्ज्ञांचा सल्ला जरुर घ्यावा.)

## पान 4 वरुन

काळे कारणामे महाराष्ट्रासमोर उघड झाले आहेत, आणखी होत आहेत.विद्यमान काळात ही राजाश्रेयाने महिलांचे अलाघ्य शोषण सुरु असणे ही शरमेने मान खाली घालायला लावणारे आहे. अघोरी कृत्य व महिलांचे शोषण करणारा हा भोंदू जरी गजाआड गेला असला तरी यावर छत्रपती शिवाजी महाराजांचे नाव घेऊन सत्तेत असलेल्या मंडळींनी गंभीर दखल घेऊन अशा समाजद्रोही, स्त्रीविरोधी प्रवृत्तीला ठेचून काढून एक शिरस्ता कायम करावा.

सोबतच राज्य महिला आयोगाच्या खुर्चीवर विराजमान असणाऱ्या रुपालीबाई चाकणकर या भोंदू बाबाच्या ट्रस्टच्या सदस्या तसेच पाठीराख्या असल्याचे समाज माध्यमांमधून समोर येत आहे. याची निपक्षपाती पद्धतीने चौकशी करुन रुपाली चाकणकर यांचा तत्काळ राजीनामा घ्यावा व निपक्षपाती चौकशी पूर्ण करुन दोषींवर कठोर कारवाई करावी यासाठी जनवादी महिला संघटना व बीड मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाकडून शुक्रवार दि 20 रोजी धारुर तहसील समोर निदर्शने करण्यात आली.

-----------------------------------

व्यवस्थापनाकडून व्यक्त करण्यात आला.

-------------------------------------

दरवाज्यातून नदीपात्रात पाणी सोडण्याचे नियोजन अद्याप ठरलेले नाही. यासंदर्भात लातूर पाटबंधारे विभागाकडे पत्रव्यवहार करण्यात आल्याची माहिती शाखा अभियंता अनुप गिरी यांनी दिली.

----------------------------------------

दर्शवून निधीची उचल करण्यात आली आहे. अनेक ठिकाणी पाईपलाईन टाकलेली नाही, तर काही प्रभागांत अद्याप पाण्याचा थेंबही पोहोचलेला नाही. ‘हर घर जल’चा नारा देणाऱ्या या योजनेचा बोजवारा उडाल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.

चौकशीची मागणी या संदर्भात जिल्हाधिकाऱ्यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, संबंधित कामाचे मेजरमेंट बुक (चइ), अंदाजपत्रक (इजट) आणि प्रत्यक्ष झालेले काम यांची तांत्रिक समितीमार्फत सखोल चौकशी व्हावी. यामध्ये मोठी तफावत असण्याची शक्यता असून, दोषी आढळणाऱ्या अभियंत्यांवर आणि गुत्तेदारावर तत्काळ गुन्हे दाखल करावेत.

प्रशासनाच्या भूमिकेकडे लक्ष योजनांच्या अंमलबजावणीत पारदर्शकता नसल्यामुळे शासनाच्या मूळ उद्देशालाच हरताळ फासला जात असल्याची प्रतिक्रिया स्थानिक नागरिकांकडून उमटत आहे. आता या प्रकरणात प्रशासन दोषींवर कारवाई करुन ग्रामस्थांना पाणी मिळवून देणार का, याकडे संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

जनता दरबारात प्रशासनाची दखल या प्रकरणाची गंभीर दखल घेत जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी जनता दरबारात स्पष्ट केले की, जल जीवन मिशन अंतर्गत मंजूर कामे जर अंदाजपत्रकानुसार पूर्ण झाली नसतील, तर त्याची सखोल चौकशी केली जाईल आणि दोषींवर कडक प्रशासकीय व कायदेशीर कारवाई केली जाईल.

-----------------------------------

मतदार संघामध्ये भाजपाचा विस्तार मोठा आहे मराठा समाजाचा मोठा नेता भाजपा मध्ये येण्यासाठी अनुकुल आहे पण वरिष्ठानीच त्यांना वेळ आल्यावर प्रवेश करु असे सांगीतल्याचे समजते तरि राज्याच्या मंत्री पंकजाताई यांनी माजलगाव मतदार संघामध्ये लक्ष घालून भाजपाचा एकोपा जोपासने गरजेचे आहे

--------------------------------------

महामार्ग प्राधिकरण आणि महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळांतर्गत विविध रस्ते विकास आणि पायाभूत सुविधांची कामे करत आहे. या कंपनीची प्रतिमा मलीन करण्याच्या उद्देशाने रेखा वंजारे यांनी छत्रपती संभाजीनगर येथील आयकर विभाग, जिल्हाधिकारी कार्यालय बीड आणि कोकण भवन येथील महामार्ग विभागाकडे खोट्या तक्रारी दाखल केल्या होत्या. या तक्रारी अर्जांची पोच पावती व्हॉट्सअ‍ॅपवर पाठवून कंपनीची आणि पदाधिकाऱ्यांची बदनामी करण्याची धमकी देण्यात आली होती.

तक्रारीनुसार, रेखा वंजारे यांनी कंपनीचे सहगुत्तेदार चांगदेव शेप यांच्याशी प्रत्यक्ष भेटून आणि फोनवरुन संपर्क साधला. या सर्व तक्रारी मागे घेण्यासाठी त्यांनी 1 कोटी रुपयांची रोख मागणी केली. या मागणीसाठी त्यांनी वारंवार फोन करुन आणि व्हॉट्सअ‍ॅपवर मेसेज पाठवून दबाव निर्माण केला होता. या संपूर्ण संभाषणाचे आणि खंडणीच्या मागणीचे पुरावे म्हणून ऑडिओ रेकॉर्डिंग्स पोलिसांना सादर करण्यात आले आहेत. या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेत अंबाजोगाई शहर पोलिसांनी रेखा वंजारे यांच्यावर भारतीय न्याय संहितेच्या कलम 308(2) अन्वये गुन्हा नोंदवला असून पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक आनंद शिंदे हे करत आहेत. दरम्यान, या निमित्ताने विविध संघटनांचे पद मिरवून त्याआडून जिल्हाभरातील शासकीय अधिकारी, कर्मचारी, गुत्तेदार यांना करण्यात येणाऱ्या ब्लॅकमेलिंगच्या प्रकरणांचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे

---------------------------------------

असून तीन पैकी कोणत्याही एका विषयावर निबंध लिहावा लागेल. प्रथम पारितोषिक 2000 रुपये द्वितीय पारितोषिक 1500 आणि तृतीय पारितोषिक 500 रुपये व प्रमाणपत्र आणि स्मृतीचिन्ह असे बक्षिसाचे स्वरुप असणार आहे. निबंध स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणाऱ्यांनी आपला निंबध दिनांक 1 एप्रिलपर्यंत 9420148538 व्हाट्सअप क्रमांकावर किंवा ranbagaikwadpress1@gmail.com या मेलवर स्वच्छ अक्षरात अथवा टाईप करुन पासपोर्ट फोटो व पूर्ण पत्यासह पाठवावा. निबंध स्पर्धेचे शब्द मर्यादा 1000 शब्दापर्यंत बंधनकारक आहे. विजेत्यांची नावे 11 एप्रिल रोजी घोषित करण्यात येतील अशी माहिती रानबा गायकवाड , साहित्यिक अजयकुमार गंडले,प्रा. डॉ. सिद्धार्थ तायडे कवी बालाजी कांबळे , पत्रकार विकास वाघमारे यांनी दिली आहे.

--------------------------------------

कैलास घुगे सर, प्राचार्य मंगेश काशीद सर प्राचार्य, शिक्षकवर्ग व पालकांनी कार्तिकचे अभिनंदन करत त्याच्या उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांच्या गुणवत्तापूर्ण शिक्षणासाठी व सर्वांगीण विकासासाठी शाळा सातत्याने प्रयत्नशील असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

या यशामुळे माऊंट लिटरा झी स्कूल ची शैक्षणिक परंपरा अधिक बळकट झाली असून, भविष्यातही असेच यश मिळवत राहण्याचा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

---------------------------------------------

नागरिकांना अक्षरशः हैराण करुन सोडत आहे —
सैल खडीवर दुचाकी घसरुन अपघात होण्याचा धोका टोकाला
खोल खड्ड्यांमुळे चारचाकी वाहनांचे मोठे नुकसान
रुग्णवाहिका व शाळेची वाहने अडकून पडत आहेत
धुळीच्या ढगामुळे श्वसनाचे त्रास वाढण्याची भीती

धक्कादायक बाब म्हणजे, काम सुरु असताना सुरक्षेचे सर्व नियम धाब्यावर बसवण्यात आले आहेत. ना सूचना फलक, ना डायव्हर्शन, ना पाणी मारण्याची व्यवस्था — परिणामी रात्रीच्या वेळी हा रस्ता मृत्यूचा सापळाच ठरत आहे.

गेल्या आठ दिवसांपासून काम बंद का आहे, याबाबत ठेकेदार किंवा संबंधित विभागाकडून कोणतीही माहिती दिली जात नाही. यामुळे नागरिकांमध्ये संशयाचे वातावरण निर्माण झाले असून, “कुणाच्या आशीर्वादाने हा बेफिकीर कारभार सुरु आहे?” असा संतप्त सवाल उपस्थित केला जात आहे.

“अपघाताची वाट पाहताय का?” – नागरिकांचा संतप्त सवाल
ग्रामस्थांनी प्रशासनाला थेट इशारा दिला आहे —
तात्काळ काम सुरु करा, अन्यथा रस्ता रोको आंदोलन अटळ!
नागरिकांच्या ठाम आणि आक्रमक मागण्या:
त्वरित काम सुरु करुन पूर्ण करावे
तात्पुरती सुरक्षित व पर्यायी वाहतूक व्यवस्था उभी करावी
दर्जेदार कामाची हमी द्यावी
विलंबामागील कारणांची चौकशी करावी
संबंधित ठेकेदार व अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी

-----------------------------------------

अभंग-भजनांच्या स्वरांत दिंडी पुढे सरकत आहे.

दिंडीचा मुक्काम प्रवास असा राहणार:

चिखलबीड □ एकुरका □ जवळूका □ भुम □ शेंद्री □ कदम वस्ती □ टेंभुर्णी □ गायकवाड वस्ती □ नातेपुते □ शिखर शिंगणापुर या पायी दिंडीत शंकर झाडे, बबन भुजबळ, सुनील डिगे, श्रीकिसन घोडके, चैतन्य राऊत, प्रदीप पाटोळे, महादेव पंधारे, गोरख घोडके, प्रदीप घोडके, कोंडीराम गुरसाळी, विकास फड, आकाश फड, नाना अंधारे, दत्तात्रय करळे, तुकाराम चौरे, दिगंबर जाधव, रवी शिंदे यांच्यासह असंख्य शिवभक्त उत्साहाने सहभागी झाले आहेत.ही दिंडी केवळ धार्मिक सोहळा नसून, श्रद्धा, परंपरा आणि सामूहिक एकतेचे जिवंत प्रतीक आहे. शेकडो शिवभक्त पायी चालत महादेवाच्या दर्शनासाठी निघाले असून, संपूर्ण परिसर भक्तिरसात न्हाऊन निघाला आहे.

-----------------------------------------------

पडला. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला. वनपरिक्षेत्र कार्यालय सामाजिक वनीकरण परळी वैजनाथच्या अधिकाऱ्यांनी नागरिकांना वृक्षसंवर्धनाच्या महत्त्वाबाबत माहिती दिली.

----------------------------------------------

नवीन कार्यकारिणीचे पदाधिकारी नगरपरिषद कंत्राटी कामगारांसह संघटित व असंघटित क्षेत्रातील कामगारांच्या समस्या सोडवण्यासाठी संबंधित प्रशासनाशी समन्वय साधणार असून, भारतीय कामगार कायद्यांनुसार मिळणाऱ्या हक्कांविषयी जागरूकता निर्माण करणार आहेत. कामगारांच्या हितासाठी प्रभावीपणे कार्य करत त्यांच्या न्याय्य मागण्यांना वाचा फोडण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

या उपक्रमासाठी प्रशासनाने सहकार्य करावे, अशी अपेक्षा व्यक्त करत ही माहिती प्रसारमाध्यमांसाठी देण्यात आली आहे.

--------------------------------------

# जीएसटी सुलभ होणार म्हणाले... मग व्यापारी अजूनही त्रस्त का?

## आश्वासन, अंमलबजावणी आणि वास्तव यामधील वाढत चाललेली दरी

**डॉ. भारत कऱ्हाड**



भारतामध्ये वस्तू आणि सेवा कर (GST) लागू होणे ही एक ऐतिहासिक आर्थिक सुधारणा मानली जाते. “एक देश – एक कर” या संकल्पनेवर आधारित ही प्रणाली देशाच्या कररचनेत एकसंधता आणण्यासाठी आणि व्यापार सुलभ करण्यासाठी राबवण्यात आली. जीएसटी लागू करताना सरकारने करप्रणाली अधिक सोपी, पारदर्शक आणि सुसंगत होईल, तसेच व्यापाऱ्यांवरील करभार आणि कागदोपत्री प्रक्रिया कमी होईल, असे स्पष्ट आश्वासन दिले होते. विशेषतः लहान आणि मध्यम व्यापाऱ्यांसाठी ही प्रणाली दिलासा देणारी ठरेल, अशी अपेक्षा निर्माण करण्यात आली होती. मात्र, कालांतराने या अपेक्षा आणि प्रत्यक्ष अनुभव यामध्ये काही प्रमाणात तफावत असल्याचे दिसून येते.

जीएसटीच्या अंमलबजावणीनंतर व्यापाऱ्यांच्या कामकाजात मूलभूत बदल झाला. पूर्वीच्या तुलनेत करप्रक्रिया अधिक डिजिटल, नियमित आणि तपशीलवार झाली. प्रत्येक व्यवहाराची नोंद ठेवणे, इनव्हॉइस तयार करणे, इनपुट टॅक्स क्रेडिटचे व्यवस्थापन करणे, तसेच नियमित रिटर्न भरावे लागणे या गोष्टी अनिवार्य झाल्या. मोठ्या उद्योगांसाठी ही प्रक्रिया तुलनेने सोपी ठरली, कारण त्यांच्याकडे आवश्यक तांत्रिक साधने आणि प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध असते. परंतु लहान व्यापाऱ्यांसाठी हीच प्रक्रिया वेळखाऊ, खर्चिक आणि अनेकदा गुंतागुंतीची ठरते. अनेकांना संगणक किंवा डिजिटल प्रणालींचे पुरेसे ज्ञान नसल्यामुळे त्यांना अतिरिक्त अडचणींचा सामना करावा लागतो.

याशिवाय, जीएसटी पोर्टलवरील तांत्रिक अडचणी, रिटर्न फाइलिंगमधील गुंतागुंत आणि नियमांमध्ये होणारे वारंवार बदल यामुळे व्यापाऱ्यांचा ताण वाढतो. रिटर्न भरण्यात झालेल्या छोट्याशा चुकीसाठीही दंड आकारला जातो, तसेच विलंब झाल्यास व्याजाचा भार वाढतो. परिणामी, अनेक व्यापारी “व्यवसाय करण्यापेक्षा करसंबंधित प्रक्रिया पूर्ण करण्यातच जास्त वेळ जातो” अशी भावना व्यक्त करतात. या पार्श्वभूमीवर व्यापाऱ्यांमध्ये अस्वस्थता निर्माण होणे स्वाभाविक आहे.

या परिस्थितीत काही सामाजिक आणि राजकीय स्तरावर असा आरोप केला जातो की, जीएसटीमुळे व्यापाऱ्यांवर पडणाऱ्या या अडचणींवरुन लोकांचे लक्ष हटवण्यासाठी सरकारकडून इतर विषयांना अधिक महत्त्व दिले जाते. म्हणजेच, आर्थिक समस्यांवर सखोल चर्चा होण्याऐवजी समाजात वेगवेगळ्या राजकीय, सामाजिक किंवा भावनिक मुद्द्यांना प्राधान्य दिले जाते. हा आरोप पूर्णपणे सत्य आहे की नाही, यावर मतभेद असू शकतात; मात्र या मुद्द्यामुळे सार्वजनिक चर्चेत एक वेगळा आयाम निर्माण झाला आहे.

दुसऱ्या बाजूला, सरकारचा दृष्टिकोनही लक्षात घेणे आवश्यक आहे. सरकारच्या मते, जीएसटीमुळे देशाच्या करप्रणालीत पारदर्शकता वाढली आहे, करदात्यांची संख्या वाढली आहे आणि महसूल संकलनातही लक्षणीय वाढ झाली आहे. राज्यांमधील करातील फरक कमी झाल्यामुळे व्यापार सुलभ झाला आहे आणि देशांतर्गत बाजारपेठ अधिक एकसंध झाली आहे. डिजिटल प्रणालीमुळे करप्रक्रियेत मानवी हस्तक्षेप कमी झाला असून भ्रष्टाचारावर काही प्रमाणात नियंत्रण आले आहे, असेही सरकारचे मत आहे. त्यामुळे जीएसटी ही दीर्घकालीन दृष्टीने फायदेशीर सुधारणा असल्याचे सरकार ठामपणे सांगते.

मात्र, या दोन भिन्न दृष्टिकोनांमध्ये एक महत्त्वाचा प्रश्न निर्माण होतो, तो म्हणजे “आश्वासन विरुद्ध वास्तव”. जीएसटी लागू करताना “प्रणाली अधिक सोपी आणि स्थिर होईल” असे जे आश्वासन देण्यात आले होते, ते आजही पुन्हा पुन्हा सांगितले जात आहे. यावरुन असे स्पष्ट होते की, हा मुद्दा नवीन नसून सुरुवातीपासूनच उपस्थित आहे. त्यामुळे प्रश्न असा निर्माण होतो की, जर सुरुवातीपासूनच सुलभतेचे आश्वासन देण्यात आले होते, तर आजही व्यापाऱ्यांना अडचणी का भासत आहेत? याचा अर्थ अंमलबजावणीत काही त्रुटी राहिल्या आहेत, ज्या दूर करण्यासाठी अजूनही ठोस प्रयत्न आवश्यक आहेत.

या पार्श्वभूमीवर सरकारच्या पातळीवर काही महत्त्वाच्या उपाययोजना करणे गरजेचे आहे. सर्वप्रथम, लहान आणि मध्यम व्यापाऱ्यांसाठी करप्रणाली अधिक सुलभ करणे आवश्यक आहे. रिटर्न फाइलिंगची प्रक्रिया कमी टप्प्यांची आणि समजण्यास सोपी करणे, तसेच तांत्रिक अडचणी कमी करण्यासाठी जीएसटी पोर्टल अधिक सक्षम आणि वापरकर्ता-अनुकूल बनवणे गरजेचे आहे. नियमांमध्ये वारंवार बदल टाळून स्थिरता राखणे, तसेच कोणतेही बदल झाल्यास त्याची स्पष्ट आणि वेळेवर माहिती देणे आवश्यक आहे. व्यापाऱ्यांसाठी प्रशिक्षण कार्यक्रम, कार्यशाळा आणि मार्गदर्शन केंद्रे यांची संख्या वाढवून त्यांना आवश्यक तांत्रिक कौशल्ये उपलब्ध करुन देणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

याशिवाय, व्यापारी संघटनांशी नियमित संवाद साधून त्यांच्या अडचणी समजून घेणे आणि त्या सोडवण्यासाठी तातडीने उपाययोजना करणे आवश्यक आहे. दंड आणि व्याज धोरणातही सुसूत्रता आणून छोट्या चुका झाल्यास कठोर कारवाई टाळणे, तसेच पहिल्या चुकीसाठी इशारा प्रणाली लागू करणे उपयुक्त ठरु शकते. या सर्व उपाययोजनांमुळे व्यापाऱ्यांचा विश्वास वाढेल आणि जीएसटी प्रणाली अधिक प्रभावीपणे कार्यान्वित होईल.

याचबरोबर, “लक्ष विचलित होणे” हा मुद्दाही गांभीर्याने विचारात घेण्यासारखा आहे. लोकशाही व्यवस्थेमध्ये कोणत्याही महत्त्वाच्या आर्थिक प्रश्नावर खुली आणि सातत्यपूर्ण चर्चा होणे अत्यावश्यक असते. माध्यमांनी केवळ सनसनाटी किंवा भावनिक मुद्द्यांवर भर न देता आर्थिक आणि धोरणात्मक विषयांनाही योग्य प्राधान्य देणे गरजेचे आहे. नागरिकांनीही विविध स्रोतांमधून माहिती घेऊन स्वतःचे मत तयार करणे आवश्यक आहे. जागरुक नागरिकत्व हीच या समस्येवरची दीर्घकालीन उपाययोजना ठरु शकते.

एकंदरीत पाहता, जीएसटी ही भारताच्या आर्थिक व्यवस्थेतील एक महत्त्वाची पायरी आहे, परंतु तिच्या अंमलबजावणीत अजूनही सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. व्यापाऱ्यांच्या अडचणी नाकारता येणार नाहीत, तसेच सरकारने केलेले सकारात्मक बदलही दुर्लक्षित करता येणार नाहीत. त्यामुळे या विषयाकडे संतुलित आणि वस्तुनिष्ठ दृष्टिकोनातून पाहणे आवश्यक आहे. केवळ आश्वासने देणे पुरेसे नाही, तर त्या आश्वासनांची प्रभावी अंमलबजावणी होणे अधिक महत्त्वाचे आहे. म्हणूनच, आजची खरी गरज ही आहे की—जीएसटी सुलभ करण्याचे जे आश्वासन सुरुवातीला देण्यात आले होते, त्याची परिणामकारक अंमलबजावणी करुन व्यापाऱ्यांना दिलासा देणे.

**डॉ. भारत कऱ्हाड प्राचार्य आणि चार्टर्ड अकाउंटंट.**

# अत्याचार करणारांची महिला आयोगाकडून पाठराखण

## माकपाचा आरोप; कठोर कारवाईसाठी धारूरमध्ये आंदोलन

धारूर : महाराष्ट्र राज्य हे पुरोगामी राज्य असल्याचा वलग्ना करणारे सत्ताधारी हेच अंधश्रद्धेला खतपाणी घालण्याचे काम करत असल्याची शंका नव्हे तर विश्वास सर्वसामान्य जनतेच्या मनात निर्माण झाला आहे. राज्य महिला आयोग महिलांचे शोषण रोखण्यासाठी की, लाडक्या बहिणींवर अत्याचार करणारांची पाठराखण करण्यासाठी? असा प्रश्न निर्माण झाला असून राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षाच्या भोंदू तांत्रिक बाबा खरात सोबतचे व्हिडीओ समाज माध्यमातून, वृत्तवाहिन्यांमधून जनसामन्यात पसरत असताना धर्मांध सत्ताधारी मात्र या प्रश्नी मूगगिळून बघायची भूमिका घेत आहे.

अंधश्रद्धेत लिप्त राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांचा तत्काळ




राजीनामा घेऊन त्याची हकालपट्टी करावी यासाठी जनवादी महिला संघटना व बीड मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने शुक्रवार , 20 रोजी धारूर तहसील कार्यालयासमोर निदर्शने केली.

शिव-शाहू-फुले-आंबेडकरांच्या पुरोगामी महाराष्ट्रात तथाकथित भोंदू तांत्रिक अशोक खरात याचे **पान 3 वर**

# ओंकार साखर कारखाना युनिट नंबर 8 पांगरी तालुका परळी वैजनाथ जिल्हा बीड या कारखान्याचा हंगाम 2025-26 ची सांगता

पांगरी:- येथील ओंकार साखर कारखाना युनिट नंबर 8 चा सांगता समारंभ चेअरमन मा.श्री बाबूरावजी बोत्रे पाटील साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली शनिवार दिनांक 21 मार्च 2026 रोजी संपन्न झाला. या वेळी विधिवत गव्हाण पूजन व काटा पूजन करून कार्यक्रम संपन्न झाला.कारखान्याने 3 लाख 40 हजार मे. टन गाळप करून शेतकऱ्यांचा विश्वास संपादन केला.

ओंकार साखर कारखान्याने या हंगामात भागातील शेतकऱ्यांना प्रति टन 3050 रुपये असा सर्वोतम ऊस दर देत शेतकऱ्यांच्या विश्वासाला न्याय दिला. ओंकार ग्रुपचे चेअरमन मा. श्री बाबूरावजी बोत्रे पाटील साहेब यांच्या प्रामाणिक प्रयत्नांना ऊस उत्पादक शेतकऱ्यांनी, कर्मचाऱ्यांनी, व ऊस तोडणी / वाहतूक ठेकेदारांनी मोठी साथ दिली. यातून चालू गळीत हंगामात कारखान्याने 3 लाख 40 हजार 916 मे.टन ऊसाचे गाळप केले आहे.



या प्रसंगी परळी भाजपा तालुका अध्यक्ष श्री राजेश गीते कारखान्याचे जनरल मॅनेजर श्री सुधाकर सोळंके साहेब पोलिस पाटील संघटनेचे माऊली मुंडे कारखान्याचे सर्व खातेप्रमुख , कर्मचारी व ऊस उत्पादक शेतकरी तसेच तोडणी /वाहतूक ठेकेदार मोठ्या संखेने उपस्थित होते.ओंकार ग्रुपच्या नेतृत्वाखाली कारखाना आगामी काळातही शेतकऱ्यांच्या,ऊस तोडकामगार व वाहतुक ठेकेदार यांच्या हिताला प्राधान्य देत योग्य दर आणि वेळेवर सेवा देण्यासाठी सदैव कटिबद्ध राहील असा विश्वास या वेळी **पान 3 वर**

# बळीराजास दिलासा! मांजरा धरणातून सिंचनासाठी पाण्याचा विसर्ग सुरू; 18 हजार हेक्टरला जीवदान

केज (जि. बीड) : उन्हाळ्याच्या पार्श्वभूमीवर शेती पिकांच्या पाण्याची गरज लक्षात घेता, धनेगाव येथील मांजरा धरणातून शेती सिंचनासाठी पाण्याचा विसर्ग सुरु करण्यात आला आहे. कालवा सल्लागार समितीच्या निर्णयानुसार, डाव्या आणि उजव्या दोन्ही कालव्यांतून 14 दलघमी पाणी सोडण्यात आले असून, यामुळे तीन जिल्ह्यांतील ऊस व उन्हाळी पिकांना मोठा आधार मिळणार आहे.



मांजरा धरणात सध्या 193.984 दलघमी एकूण पाणीसाठा असून त्यापैकी उपयुक्त साठा 135.726 दलघमी (74.37 टक्के) इतका आहे. धरणातून पुढील 15 दिवस पाणी सोडले जाणार असल्याची माहिती सहायक अभियंता अभिजित नितनवरे यांनी दिली.

डावा कालवा (90 किमी) : रेणापूर (5902 हेक्टर), अंबाजोगाई (3776 हेक्टर) आणि केज (941 हेक्टर) तालुक्यातील शेतीला लाभ होईल.

उजवा कालवा (78 किमी) : लातूर (6977 हेक्टर) आणि कळंब (682 हेक्टर) तालुक्यातील क्षेत्राला पाणी मिळणार आहे. कालव्यांतून पाणी सुटले असले तरी, मांजरा नदीवरील बंधाऱ्यांवर अवलंबून असलेल्या शेतकऱ्यांनी अद्याप पाणीपट्टी भरलेली नाही. तसेच त्यांची मागणी नसल्याने धरणाच्या मुख्य **पान 3 वर**

# कारी येथे 'जल जीवन'चा बोजवारा; भ्रष्टाचाराचे गंभीर आरोप

## » गुत्तेदार आणि अधिकाऱ्यांवर फौजदारी कारवाई करा : मिलिंद मुजमुले

धारूर : धारूर तालुक्यातील कारी येथे 'जल जीवन मिशन' अंतर्गत सुरु असलेल्या पाणीपुरवठा योजनेत मोठ्या प्रमाणात अनियमितता आणि भ्रष्टाचार झाल्याचे समोर आले आहे. योजनेची कामे कागदावरच पूर्ण दाखवून लाखो रुपयांची बिले हडपल्याचा आरोप करण्यात येत असून, याप्रकरणी संबंधित गुत्तेदार व जबाबदार अधिकाऱ्यांवर फौजदारी गुन्हे दाखल करण्याची मागणी सामाजिक कार्यकर्ते मिलिंद मुजमुले यांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.




मिळालेल्या माहितीनुसार, कारी गावासाठी मंजूर करण्यात आलेली 'जल जीवन मिशन'ची कामे अंदाजपत्रकानुसार पूर्ण करण्यात आलेली नाहीत. प्रत्यक्ष जमिनीवर काम अपूर्ण असतानाही, अधिकाऱ्यांच्या संगनमताने काम पूर्ण झाल्याचे **पान 3 वर**

# माजलगाव मतदार संघामध्ये भाजपाच्या सक्षम नेत्याची गरज



धारूर ( बाबुराव तिडके ) माजलगाव मतदार संघ हा पूर्वी भाजपाचा बालेकिल्ला होता भाजपाचे आमदार म्हणुन कै आर टी देशमुख साहेब यांनी या मतदार संघाचे नेतृत्व केले हा मतदार संघ काबीज करण्यासाठी अनेक बडे नेते भाजपा मध्ये आले नंतर गेले पण आमदारकीचे स्वप्न अधुरेच राहिले या मतदार संघामध्ये स्वच्छ प्रतिमा सर्वांना बरोबर घेऊन चालणाऱ्या भाजपाच्या नेत्याची गरज आहे सद्या परिस्थितीमध्ये हा मतदार संघ भाजपाच्या नेत्याविना दिशाहिन आहे भविष्यात या मतदार संघामध्ये विधानसभा लढण्यासाठी मंत्री पंकजा मुंडे असु शकतात नसता सोळंके घराण्यातीलच भाजपाचा उमेदवार असु शकतो तरी मंत्री पंकजाताई मुंडे यांनी माजलगाव मतदार संघामध्ये लक्ष घालणे गरजेचे आहे माजलगावची नगरपरिषद भाजपाच्याच नेत्यांनी भाजपाच्या विरोधात जाऊन घालवली या **पान 3 वर**

# कन्स्ट्रक्शनच्या सहगुत्तेदाराकडे एक कोटींची खंडणी मागणाऱ्या महिलेवर गुन्हा दाखल




अंबाजोगाई : राज्यभरात नामांकित असलेल्या एका कन्स्ट्रक्शन कंपनीच्या विरोधात शासकीय कार्यालयात खोट्या तक्रारी दाखल केल्या. त्या मागे घेण्यासाठी 1 कोटी रुपयांच्या खंडणीची मागणी केल्याप्रकरणी रेखा उत्तम वंजारे यांच्यावर अंबाजोगाई शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला. कंपनीचे सहगुत्तेदार चांगदेव शेप यांना ही खंडणी मागण्यात आली असून, या प्रकरणाने बीड जिल्ह्यात मोठी खळबळ उडाली आहे. आरोपी महिला भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीची तालुका संघटक असल्याचे समोर आले असून, तिने पदाचा गैरवापर करत ही खंडणी मागितल्याचा आरोप करण्यात आला आहे.

फिर्यादीत दिलेल्या माहितीनुसार, एक कन्स्ट्रक्शन कंपनी सन 2007 पासून राष्ट्रीय **पान 3 वर**

# डॉ .बाबासाहेब आंबेडकर यांच्या 136 व्या जयंतीनिमित्त निबंध स्पर्धांचे आयोजन- रानबा गायकवाड

## » मान्यवरांच्या हस्ते होणार बक्षीस वितरण

परळी प्रतिनिधी. महामानव ,विश्वरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या 136 व्या जयंतीनिमित्त दैनिक सम्राट व सायं .दै.परळी बुलेटिनच्या वतीने निबंध स्पर्धांचे आयोजन करण्यात आल्याची माहिती मुख्य संयोजक ज्येष्ठ पत्रकार व साहित्यिक रानबा गायकवाड यांनी दिली आहे.

याबाबत प्रसिद्ध केलेल्या पत्रकात म्हटले आहे की, महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर जगातील सर्वात महान विद्वान होते. संपूर्ण जग त्यांना सिम्बॉल ऑफ नॉलेज म्हणून



ओळखते. भारतीय राज्यघटनेचे निर्माते तथा या देशाचे नवराष्ट्र निर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर आहेत . या देशातील तमाम महिलांच्या उद्धाराकरिता त्यांनी भारतीय राज्यघटनेत आणि हिंदू कोड बिलाच्या माध्यमातून महान असे कार्य केले आहे.त्यामुळे त्यांच्या कार्यावर निबंधाच्या माध्यमातून प्रकाश टाकावा याकरिता या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

निबंध स्पर्धेसाठी राष्ट्रनायक डॉ बाबासाहेब आंबेडकर व भारतातील महिलांचे उद्धारक डॉ.बाबासाहेब आंबेडकर , तसेच भारतीय संविधान व धर्म स्वातंत्र्य हे विषय ठेवण्यात आले आहेत. निबंध स्पर्धा सर्वांसाठी खुली **पान 3 वर**

# माऊंट लिटरा झी स्कूलचा विद्यार्थी कार्तिक विजय मुंडे यांचे घवघवीत यश



परळी/प्रतिनिधी –

परळी येथील माऊंट लिटरा झी स्कूल च्या विद्यार्थ्यांनी यंदा विविध स्पर्धा परीक्षांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करून शाळेचा नावलौकिक वाढवला आहे.

शाळेतील विद्यार्थी कार्तिक विजय मुंडे याने एकाच वेळी तीन महत्त्वाच्या परीक्षांमध्ये यश मिळवत 'हॅट-ट्रिक ऑफ सक्सेस' साध्य केली आहे. त्याने राष्ट्रीय मिलिटरी स्कूल प्रवेश परीक्षा (RMS) मध्ये उत्तीर्ण होत आपली गुणवत्ता सिद्ध केली, तसेच अखिल भारतीय सैनिक शाळा प्रवेश परीक्षा (AISSEE) परीक्षेत यश मिळवले. याशिवाय त्याची निवड जवाहर नवोदय विद्यालय (JNV) मध्ये झाली आहे.

या तिहेरी यशामुळे कार्तिक मुंडे याचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे. बीड जिल्ह्यातील विद्यार्थ्याने मिळवलेले हे यश इतर विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी ठरत आहे.

शाळेचे अध्यक्ष डॉ. हरिश्चंद्र वंगे दादा, उपाध्यक्ष प्राध्यापक **पान 3 वर**

# ठेकेदाराचा बेफिकीर कारभार; वडवणी–चिंचोटी रस्ता बनला थेट 'जीवघेणा सापळा'!

## प्रशासन गप्प का?

वडवणी | प्रतिनिधी

वडवणी ते चिंचोटी या अत्यंत महत्त्वाच्या रस्त्यावर सुरु असलेले काम सध्या नागरिकांसाठी थेट जीवघेणा सापळा ठरत असून, ठेकेदाराच्या बेफिकीर आणि बेजबाबदार कारभारामुळे संतापाचा उद्रेक होत आहे. रस्ता पूर्णपणे उखडून त्यावर सैल खडी टाकून काम अर्धवट सोडण्यात आले असून, गेल्या 7 ते 8 दिवसांपासून काम बंद पडले आहे. ठेकेदाराचा कुठलाही मागमूस नसताना प्रशासन मात्र गूढ शांतता पाळत असल्याने प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.



हरिश्चंद्र पिंपरी, हरिश्चंद्र पिंपरी तांडा, चिंचवडगाव, काडीवडगाव या गावांची जीवनवाहिनी असलेला हा रस्ता आज मृत्यूच्या उंबरठ्यावर उभा आहे. शेकडो विद्यार्थी, शेतकरी, कामगार आणि व्यावसायिक दररोज या मार्गावरून प्रवास करतात; पण सध्या हा प्रवास म्हणजे अक्षरशः जीवाशी खेळ ठरत आहे.

रस्त्यावरील भीषण परिस्थिती **पान 3 वर**

# हर हर महादेवच्या जयघोषात वडवणीहून शिखर शिंगणापुरकडे पायी दिंडीचे प्रस्थान!

वडवणी | प्रतिनिधी

चैत्र एकादशीच्या पावन पर्वानिमित्त वडवणी येथून शिखर शिंगणापुरकडे निघालेल्या पायी दिंडीने परिसर भक्तिमय केला. "हर हर महादेव"च्या जयघोषात गुरुवार, दि. 19 मार्च 2026 रोजी मोठ्या उत्साहात दिंडीचे प्रस्थान झाले.

गेल्या 46 वर्षांची अखंड परंपरा जपत वडवणीतील किसन बाबा ओतारी यांनी सुरु केलेल्या या पवित्र दिंडी सोहळ्याला आजही तितक्याच भक्तिभावाने प्रतिसाद मिळत आहे. त्यांच्या आशीर्वादाने गेणाबापू पाटोळे व दिनकर फड यांच्या मार्गदर्शनाखाली दिंडीचे नियोजन पार पडत असून,



भक्तांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळाले.

या दिंडीत विविध धार्मिक प्रतीकांचा समावेश असून, शंभो महादेवाची कावड, शिवाजी पाटोळे यांची कावड, दिनकर फड यांची काठी, तसेच गोरख घोडके यांची शंभू महादेवाची काठी हे श्रद्धेचे केंद्रबिंदू ठरले आहेत. टाळ-मृदंगाच्या गजरात आणि **पान 3 वर**



● परळी वैजनाथ पंचायत समितीचे माजी उपसभापती हाजी जानेमिया शेठ कुरेशी यांच्या निवासस्थानी ईद निमित्त त्यांना शुभेच्छा देतांना निळकंठ दराडे, अजय बळवंत गोविंद मुंडे, महादेव गित्ते, फयाज कुरेशी, दत्ता कराड, सिराज कुरेशी आदी उपस्थित होते.

# परळीत वनपरिक्षेत्र अधिकारी सामाजिक वनीकरणच्या वतीने जागतिक वन दिन वृक्षारोपण करून साजरा

परळी वैजनाथ (प्रतिनिधी) :- वनपरिक्षेत्र कार्यालय सामाजिक वनीकरण परळी वैजनाथ यांच्याकडून आज स्वामी श्रद्धा नंद गुरुकुल आर्य समाज या ठिकाणी 21 मार्च जागतिक वन दिन वृक्षारोपण करून साजरा करण्यात आला.



21 मार्च, जागतिक वन दिनानिमित्त, वनपरिक्षेत्र कार्यालय सामाजिक वनीकरण परळी वैजनाथच्या वतीने स्वामी श्रद्धा नंद गुरुकुल आर्य समाज येथे वृक्षारोपणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमात पर्यावरण संवर्धन, आणि विद्यार्थ्यांमध्ये वृक्ष लागवडीची आवड निर्माण करणे, वानांचे महत्व काय आहे त्यांचे जतन करणे या विषयी मार्गदर्शन करण्यात आले. वृक्षारोपण कार्यक्रम मा. विभागीय वन अधिकारी सामाजिक वनिकारण मा.लखमावड साहेब व सहाय्यक वनसंरक्षक बिराजदार साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली पार **पान 3 वर**

# राष्ट्रीय मूलनिवासी बहुजन कर्मचारी संघ परळी नगरपरिषद कंत्राटी कामगार शाखा स्थापन

## अध्यक्षपदी विक्रांत समिंदरसावळे, उपाध्यक्ष अमोल मस्के, सचिव सुमेर समिंदरसावळे यांची नियुक्ती

परळी वै प्रतिनिधी : राष्ट्रीय मूलनिवासी बहुजन कर्मचारी संघ (RMBKS) या ट्रेड युनियनची नगरपरिषद कंत्राटी कामगारांची परळी वैजनाथ शाखा अधिकृतपणे स्थापन करण्यात आली असून, या शाखेला राज्य कार्यकारिणीकडून मंजुरी मिळाल्याची माहिती देण्यात आली आहे. सदर संघटनेची नोंदणी भारतीय ट्रेड युनियन अधिनियम 1926 अंतर्गत (रजि. क्र. ALC/17/10744, दि. 30 मे 2013) झाली आहे.

मा. वामन मेश्राम यांच्या अध्यक्षतेखाली कार्यरत असलेली



ही संघटना देशभरातील सरकारी व खाजगी क्षेत्रातील संघटित व असंघटित कामगारांच्या हक्कांसाठी लढा देत असून, त्यांना न्याय मिळवून देण्यासाठी सातत्याने कार्यरत आहे. याच पार्श्वभूमीवर परळी वैजनाथ येथे नगरपरिषद कंत्राटी कामगारांची शाखा स्थापन करण्यात आली आहे.

दि. 20 मार्च 2026 रोजी जाहीर करण्यात आलेल्या कार्यकारिणीत विक्रांत सूर्यकांत समींदरसवळे (अध्यक्ष), बालाजी मारोती गजबे (कार्यकारी अध्यक्ष), अविनाश वसंतराव गायकवाड (महासचिव), अमोल अर्जुन मस्के (उपाध्यक्ष), सुमेर सूर्यकांत समींदरसवळे (सचिव ) संध्या भैय्यासाहेब जगतकर (कोषाध्यक्ष )लता पंडित इंगळे यांच्यासह सदस्य पदी सुनील माणिकराव जगतकर, कैलास हरिभाऊ उपाडे भैय्यासाहेब शिवाजीराव जगतकर अतुल अनिल चौरे, सुभाष गित्ते आदींचा समावेश आहे.

**पान 3 वर**